CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. ३० जानेवारी २०२६ | वर्ष - ३ रे | अंक २९३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### 'महाराष्ट्र पॅटर्न'चे सर्वोच्च न्यायालयाने केले कौतुक

**नवी दिल्ली :** नवी दिल्ली :देशातील भटक्या कुत्र्यांची वाढती संख्या आणि नागरिकांना होणारे दंश या गंभीर विषयावर सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी तीव्र नाराजी व्यक्त केली. भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण, श्र्वान निवारा केंद्रांची उभारणी आणि शैक्षणिक संस्थांच्या आवारातून कुत्र्यांना हटवण्याबाबत विविध राज्यांनी केलेल्या उपाययोजना अपुऱ्या असल्याचे ताशेरे न्यायालयाने ओढले. सुनावणी दरम्यान महाराष्ट्र सरकारने सादर केलेल्या माहितीची न्यायालयाने दखल घेतली. महाराष्ट्रात या प्रश्र्नी तयार करण्यात आलेल्या 'ऑनलाईन डॅशबोर्ड' मॉडलचे सर्वोच्च न्यायालयाने कौतुक केले. तसेच ही एक चांगली सुरुवात असून इतर राज्यांनीही महाराष्ट्राच्या या मॉडेलचे अनुकरण करावे, असेही सुचवले.सुनावणी दरम्यान महाराष्ट्र सरकारने सादर केलेल्या माहितीची न्यायालयाने दखल घेतली. आम्ही एक 'ऑनलाईन डॅशबोर्ड' तयार केला असून त्याद्वारे कुत्र्यांचा चावा, लसीकरण, निर्बीजीकरण आणि पशुवैद्यकीय केंद्रांची रिअल-टाइम माहिती उपलब्ध होत आहे, असे महाराष्ट्र सरकारच्या वतीने सांगण्यात आले. यावर न्यायालयाने समाधान व्यक्त करत, ही एक चांगली सुरुवात असून इतर राज्यांनीही महाराष्ट्राच्या या मॉडेलचे अनुकरण करावे, असे सुचवले.

### भारताला नुकसान पोहोचवणे, हाच पाकिस्तानचा अजेंडा

नवी दिल्ली : भारताने संयुक्त राष्ट्र परिषदेत पाकिस्तानवर जोरदार हल्ला चढवला आहे. 'पाकिस्तानने नेहमीच विनाकारण कुरापती काढल्या असून, भारत आणि भारतीय जनतेला नुकसान पोहोचवणे हाच त्याचा एकमेव अजेंडा राहिला आहे.', अशी जोरदार टीका भारताचे संयुक्त राष्ट्रातील स्थायी प्रतिनिधी पर्वतानेनी हरीश यांनी केली. तसेच ऑपरेशन सिंदूरबाबत पाकिस्तानच्या खोट्या दाव्यांवरही प्रश्र्नचिन्ह उपस्थित केले. पर्वतानेनी हरीश यांनी पाकिस्तानचा दहशतवादाशी असलेला निकटचा संबंध ठामपणे अधोरेखित केला.

### पनवेल पालिकेकडून १५ फेब्रुवारीपर्यंत पीएम-एसवायएम पेन्शनची नोंदणी सुरू

पनवेल : महानगरपालिकेच्या वतीने दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजनासाठी विशेष नोंदणी मोहिमेचे आयोजन करण्यात आले. ही मोहीम १५ फेब्रुवारीपर्यंत असणार आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील लाभार्थ्यांनी या योजनेचा जास्तीतजास्त लाभ घ्यावा असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले. या योजनेचा लाभ असंघटित क्षेत्रातील कामगारांना देण्यात येत असून यामध्ये रिक्षाचालक, फेरीवाले, छोटे व्यापारी, घरगुती कामगार,शेती कामगार, बांधकाम कामगार, हातमाग कामगार आदींचा समावेश आहे. लाभार्थ्यांचे वय १८ ते ४० वर्षे दरम्यान असणे आवश्यक असून मासिक उत्पन्न १५,००० रुपयांपेक्षा कमी असावे. याकरिता १५ फेब्रुवारीपर्यंत नोंदणी सुरु असणार आहे.

### बसचालकाची वाहनांना धडक विद्यार्थी थोडक्यात बचावले

पुणे : हल्ली वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवल्यामुळे अनेक रस्ते अपघाताच्या घटना या घडत आहे. असाच एक धक्कादायक आणि निष्काळजीपणाचा कळस असलेला प्रकार पुण्यातून उघडकीस आला आहे. या प्रकारामुळे चक्क ३० ते ४० विद्यार्थ्यांचे जीव हे टांगणीला लागले होते.बायफ रोडवरील इंडो स्कॉट ग्लोबल शाळेच्या मद्यधुंद बस चालकाने चार दुचाकी आणि एका कार ला धडक जोरदार धडक दिली . बस चालकाने काही अंतरावर वाहन फरफटतही नेली. मिळालेल्या माहितीनुसार बत्ता बसंत रसाळ (वय ५० ) असे अटक केलेल्या बस चालकाचे नाव आहे. या भयंकर अपघातानंतर नागरिकांनी शाळेच्या बसचा पाठलाग केला आणि बस थांबवली. या प्रकारामुळे संतप्त नागरिकांनी बस चालकाला बेदम चोप देत पोलिसांच्या हवाली केले. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नसून विद्यार्थ्यांचे जीव थोडक्यात बचावले.

### भारत व युरोपियन युनियनमध्ये मुक्त व्यापार कराराची अधिकृत घोषणा

नवी दिल्ली : भारत आणि युरोपियन युनियनमध्ये मुक्त व्यापार कराराची अधिकृत घोषणा मंगळवारी करण्यात आली आहे. भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातील 'मदर ऑफ ऑल डील'वर स्वाक्षरी करण्यात आली आहे. त्यामुळे भारतासाठी हा ऐतिहासिक निर्णय मानला जात आहे. भारत व युरोपियन संघातील या मुक्त व्यापार कराराची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली आहे. भारत आणि युरोपियन युनियनमधील करार म्हणजे 'सर्व करारांची जननी' असल्याचे भाष्य पंतप्रधान मोदींनी केले आहे. 'भारत-युरोपियन युनियन व्यापार करारामुळे भारतातील उत्पादन वाढेल आणि देशातील सेवा आणि संबंधित क्षेत्रांचा मोठ्या प्रमाणात विस्तार होण्यास मदत होईल.

# पार्थ आणि जय पवारांनी दिली मुखाग्नी

## शासकीय इतमामात दादा अनंतात विलीन





**तभा वृत्तसेवा**

**बारामती, दि.२९ जानेवारी : महाराष्ट्राच्या राजकारणातील एका धडाडीच्या आणि शिस्तप्रिय पर्वाचा आज बारामतीच्या मातीत शेवट झाला. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर आज वाजता शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे सुपुत्र पार्थ पवार आणि जय पवार यांनी जड अंतःकरणाने आपल्या वडिलांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला, तेव्हा उपस्थितांचा काळजाचा ठोका चुकला आणि संपूर्ण विद्या प्रतिष्ठान परिसर शोकसागरात बुडाला.**

अंत्यसंस्कारापूर्वी महाराष्ट्र पोलिसांच्या पथकाने बंदुकीच्या तीन फैरी झाडून अजित पवार यांना मानवंदना दिली. बिगुलच्या करुण सुरांनी हवेत एक वेगळीच शांतता पसरली होती. जसा पार्थिवाला मुखाग्नी देण्यात आला, तसा लाखो कार्यकर्त्यांनी 'अजित दादा अमर रहे' आणि 'एकच वादा, अजित दादा' अशा घोषणा देत आपल्या लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप दिला.

पार्थ आणि जय पवार आपल्या पित्याला निरोप देताना अत्यंत भावूक झाले होते. वडिलांचा वारसा आणि त्यांची शिस्त सोबत घेऊन चालणाऱ्या या दोन्ही पुत्रांना सावरताना जवळच्या नातेवाईकांनाही कठीण जात होते. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि अनेक केंद्रीय मंत्र्यांसह सर्वपक्षीय नेते उपस्थित होते. बारामतीकरांनी आपल्या या 'लोकनेत्या'ला निरोप देण्यासाठी पहाटेपासूनच गर्दी केली होती, ज्याचे रूपांतर दुपारी एका अलोट जनसागरात झाले.













## सर्वोच्च न्यायालयाकडून यूजीसीच्या नवीन नियमांना स्थगिती

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सर्वोच्च न्यायालयाकडून केंद्रीय विद्यापीठ आयोगाच्या म्हणजेच यूजीसीच्या नवीन नियमांना स्थगिती देण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाने आज म्हणजेच गुरुवार २९ जानेवारी रोजी यूजीसीच्या नवीन नियमांवर निर्णय देत यूजीसीच्या नवीन मार्गदर्शक तत्त्वांना तात्काळ स्थगिती दिली आहे.

काय आहे सर्वोच्च न्यायालयाची भूमिका ?

सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय विद्यापीठ आयोगाच्या वादग्रस्त नियमांना स्थगिती दिली आहे. प्राथमिकदृष्ट्या हे नियम अस्पष्ट असल्याची महत्त्वाची टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने यावेळी केली. तसेच या नवीन नियमांची चौकशी करणे आवश्यक आहे; आणि नियमांची भाष ही स्पष्ट हवी. त्यामुळे त्याआधारे दुरुपयोग होणार नाही असे न्यायालयाने स्पष्ट केले. त्याचसोबत सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला याविषयीचे नियमन करण्याचे आदेश दिले आहेत. जोपर्यंत केंद्र सरकारचे नियमन पूर्ण होत नाही, तोपर्यंत २०१२ मधील जुनाच नियम लागू राहील आणि या प्रकरणाची पुढील सुनावणी १९ मार्च २०२६ रोजी होईल असे देखील सांगितले.

यूजीसीचे नवीन नियम कोणते ?

१) प्रत्येक महाविद्यालयात समान संधी केंद्र (ईओसी) स्थापन केले जाईल. २) ईओसी वंचित आणि उपेक्षित विद्यार्थ्यांना शिक्षण, शुल्क आणि भेदभावाबाबत मदत करेल. ३) प्रत्येक महाविद्यालयात महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली एक समानता समिती असेल. ४) या समितीमध्ये अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय, महिला आणि अपंग यांचा समावेश असेल. समितीचा कार्यकाळ दोन वर्षांचा असेल. ५) महाविद्यालयात एक समानता पथक देखील असेल, जे भेदभावाचे निरीक्षण करेल. ६) भेदभावाच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर २४ तासांच्या आत बैठक आवश्यक असेल. १५ दिवसांच्या आत महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे अहवाल सादर केला जाईल. ७) महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे सात दिवसांच्या आत पुढील कारवाई सुरू करणे आवश्यक असेल. ८) ईओसी दर सहा महिन्यांनी महाविद्यालयाला अहवाल देईल. ९) महाविद्यालयाला दरवर्षी जातीय भेदभावाबाबत यूजीसीकडे अहवाल सादर करावा लागेल. १०) यूजीसी एक राष्ट्रीय देखरेख समिती स्थापन करेल. या नियमांचे उल्लंघन केल्यास महाविद्यालयाचे अनुदान रोखले जाऊ शकते. ११) महाविद्यालयाची पदवी, ऑनलाइन आणि दूरस्थ शिक्षण कार्यक्रम निलंबित केले जाऊ शकतात. १२) गंभीर प्रकरणांमध्ये, यूजीसीची मान्यता देखील रद्द केली जाऊ शकते.

## गृहमंत्री अमित शहा, फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्याकडून दादांना अखेरचा निरोप

**तभा वृत्तसेवा**

**बारामती, दि.२९ जानेवारी :** गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अजित पवार यांना अखेरचा निरोप दिला आहे. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी बारामतीत अजित पवारांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करत अंतिम दर्शन घेतले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीही उपस्थिती होती. तिघांनीही एकत्र येत अजित पवारांच्या पार्थिवास अभिवादन केले.

महाराष्ट्राच्या राजकारणातील एका धडाडीच्या आणि शिस्तप्रिय पर्वाचा आज बारामतीच्या मातीत शेवट झाला. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे सुपुत्र पार्थ पवार आणि जय पवार यांनी जड अंतःकरणाने आपल्या वडिलांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला, तेव्हा उपस्थितांचा काळजाचा ठोका चुकला आणि संपूर्ण विद्या प्रतिष्ठान परिसर शोकसागरात बुडाला.

पार्थ आणि जय पवार आपल्या पित्याला निरोप देताना अत्यंत भावूक झाले होते. वडिलांचा वारसा आणि त्यांची शिस्त सोबत घेऊन चालणाऱ्या या दोन्ही पुत्रांना सावरताना जवळच्या नातेवाईकांनाही कठीण जात होते. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि अनेक केंद्रीय मंत्र्यांसह सर्वपक्षीय नेते उपस्थित होते. बारामतीकरांनी आपल्या या 'लोकनेत्या'ला निरोप देण्यासाठी पहाटेपासूनच गर्दी केली होती, ज्याचे रूपांतर दुपारी एका अलोट जनसागरात झाले.

### राष्ट्रवादीची महाराष्ट्रातील सर्व चित्रपटगृहांना विनंती

**तभा वृत्तसेवा**

**पुणे, दि.२९ जानेवारी :** राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रसचे नेते अजित पवार यांच्या अकाली निधनाने राज्याच्या राजकीय वर्तुळातसह सर्वांच्याच मनात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. अजित दादांना आज बारामती मधील विद्या प्रतिष्ठान मध्ये हजारोंच्या साक्षीनं अखेरचा निरोप देण्यात आला. (२८ जानेवारी ) बारामती विमानतळा जवळ धावपट्टीवरून अवघ्या शंभर मीटर अंतरावर विमान कोसळून अजित पवारांसह ५ जणांचा मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. सर्व स्तरातून अजितदादांच्या आठवणींना उजाळा दिला जात असताना महाराष्ट्रातील सर्व चित्रपटगृहात तीन दिवस भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्याची व्यवस्था करण्यात यावी अशी विनंती राष्ट्रवादी चित्रपट व सांस्कृतिक विभागाच्या वतीने राज्यातील सर्व चित्रपटगृहांच्या मालकांना तसेच मल्टिप्लेक्स चालक व व्यवस्थापकांना करण्यात आली आहे. अजित पवारांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व चित्रपटगृहात तीन दिवस भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्याची व्यवस्था करण्यात यावी अशी विनंती राष्ट्रवादी चित्रपट व सांस्कृतिक विभागाच्या वतीने करण्यात आली आहे.

## प्रजासत्ताक दिन संचलनात महाराष्ट्राचा चित्ररथ देशात सर्वोत्कृष्ट

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीतील कर्तव्यपथावर पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे सादरीकरण सर्वोत्कृष्ट ठरले आहे. यंदाच्या संचलनामध्ये राज्यांच्या चित्ररथांमध्ये महाराष्ट्राच्या चित्ररथाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. केंद्र सरकारकडून या निकालांची अधिकृत घोषणा करण्यात आली असून, या गटात जम्मू-काश्मीर आणि केरळ या राज्यांनी अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला आहे.

यंदा महाराष्ट्राने 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या संकल्पनेवर आधारित चित्ररथ सादर केला होता. या चित्ररथाच्या




माध्यमातून महाराष्ट्राची समृद्ध लोकसंस्कृती, गणेशोत्सवाचा सामाजिक वारसा आणि त्यातून मिळणारा आर्थिक रोजगार व आत्मनिर्भरतेचा संदेश अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात आला होता. चित्ररथावरील भव्य गणेशमूर्ती, पारंपरिक ढोल-ताशा पथक आणि लेझीम खेळणाऱ्या कलाकारांच्या उत्साहाने कर्तव्यपथ दुमदुमून गेला होता. याच प्रभावी सादरीकरणामुळे परीक्षकांनी राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या गटातून महाराष्ट्राच्या चित्ररथाला सर्वोत्तम चित्ररथ म्हणून निवडले आहे.

केवळ राज्यांच्या श्रेणीतच नव्हे, तर इतर विभागांतही चुरस पाहायला मिळाली. यामध्ये सेना दलातून 'भारतीय नौदल' तर निमलष्करी दलातून 'दिल्ली पोलीस' यांच्या संचलन पथकाला सर्वोत्कृष्ट म्हणून गौरवण्यात आले. केंद्रीय मंत्रालयांच्या गटामध्ये सांस्कृतिक मंत्रालयाच्या चित्ररथाने बाजी मारली, तर केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग आणि 'वंदे मातरम्' नृत्य समूहाला विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## आमच्यात सर्वकाही अलबेल, राहुल गांधी आणि खरगे यांना भेटल्यानंतर शशी थरूर यांचं विधान

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शशी थरूर यांनी आज, गुरुवारी (२९ जानेवारी) पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची भेट घेऊन त्यांच्या तक्रारींचे निवारण केले. तसेच केरळ विधानसभा निवडणुकीपूर्वी आमच्यात सर्वकाही अलबेल असल्याचेही त्यांनी सांगितले.

संसद भवन संकुलातील खरगे यांच्या दालनात झालेली ही बैठक तब्बल १ तास ४५ मिनिटांपेक्षा जास्त वेळ चालली. या भेटीविषयी बोलताना शशी थरूर म्हणाले की; राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे यांच्यासोबत माझी चर्चा झाली. आमची चर्चा खूप चांगली, रचनात्मक, आणि सकारात्मक झाली, पुढे बोलताना त्यांनी सांगितले की; आमच्यात सर्व काही अलबेल आहे आणि आम्ही एकत्र वाटचाल करत आहोत. मी आणखी काय सांगू.

यावेळी पत्रकारांनी केरळ निवडणुकीसाठी मुख्यमंत्रीपदाच्या चेहऱ्यावर चर्चा झाली का, असे विचारले असता थरूर म्हणाले, तो मुद्दा कधीच नव्हता. मला कोणत्याही गोष्टीचा उमेदवार होण्यात रस नाही. सध्या मी खासदार आहे, तिरुवनंतपुरममधील माझ्या मतदारांचा माझ्यावर विश्र्वास आहे. संसदेत त्यांचे हित जपण्याचे काम मला करावे लागेल, तेच माझे काम आहे. केरळमधील पक्ष नेत्यांनी थरूर यांना बाजूला केल्याच्या कथित घटनेमुळे थरूर नाराज होते अशा चर्चा राजकीय वर्तुळात रंगल्या होत्या. तसेच भारत-पाकिस्तान संबंध आणि राजनैतिक संपर्काबद्दलच्या त्यांच्या टिप्पण्यांवरून आणि यापूर्वी झालेल्या मतभेदांमुळेही तणाव निर्माण झाला होता.

## संक्षिप्त वृत्त...

### पेगर गव्हाण येथे नवयुवक तरुण मित्र मंडळाचा पर्यावरण संवर्धनाचा संकल्प

जिल्हा परिषद प्रशालेच्या परिसरात तब्बल ३०० वृक्षरोपे लावून या उपक्रमाची सुरुवात

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील पेगर गव्हाण येथे नवयुवक तरुण मित्र मंडळाच्या वतीने जिल्हा परिषद प्रशालेच्या परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. बदलत्या सामाजिक परिस्थितीत आजचा युवक मोठ्या प्रमाणावर व्यसनाधीन व दिशाहीन होत असताना, रोजगाराच्या मर्यादित संधींमुळे अनेक तरुण निराशेच्या गर्तेत अडकले आहेत. अशा पार्श्वभूमीवर पेगर गव्हाण येथील तरुणांनी एकत्र येत विधायक मार्गाची निवड करत पर्यावरण रक्षणाचा संकल्प केला आहे.

गावातील होतकरू, ध्येयवेडे आणि समाजभान असलेले तरुण एकत्र येत नवयुवक तरुण मित्र मंडळाच्या माध्यमातून जिल्हा परिषद प्रशालेच्या परिसरात तब्बल ३०० वृक्षरोपे लावून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. हा उपक्रम केवळ वृक्षारोपणापुरता मर्यादित न राहता गावाच्या सर्वांगीण विकासाचा पाया घालणारा ठरणार आहे. गावातील वामाचाराला फाटा देत सदाचार, सद्गुण आणि समाजोपयोगी मूल्यांची जपणूक व्हावी, यासाठी ज्ञान, विज्ञान आणि आध्यात्म यांची सांगड घालून विज्ञाननिष्ठ, विवेकी आणि सुजाण समाज घडविण्याचा निर्धार मंडळाने केला आहे. या अनुषंगाने विविध सामाजिक, शैक्षणिक व प्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्ये गावात वाचनालयाची उभारणी, व्यायामशाळा सुरू करणे, जिल्हा परिषद प्रशालेची देखभाल-दुरुस्ती, गरीब व होतकरू गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा, तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विक्रमी उत्पादन घेणाऱ्या परिश्रमशील शेतकरी व कष्टकऱ्यांचा गौरव सोहळा आयोजित करण्याचा मानस आहे.

स्वच्छ पाणी, आरोग्य, शिक्षण, शेतीपूरक उद्योग, स्वच्छता व पर्यावरण संवर्धन या विषयांवर विविध उपक्रम राबवून सुजाण नागरिक घडविण्याचा मंडळाचा प्रयत्न आहे. यासोबतच गावात दुधगंगा वाढीस लागावी यासाठी गायी, म्हशी, शेळ्या, मेंढ्या यांसारख्या दुभत्या जनावरांसाठी मदत व मार्गदर्शन, आधुनिक तंत्रज्ञानयुक्त शेती व शेतीपूरक व्यवसायांच्या माध्यमातून आर्थिक सबलीकरण करण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला आहे.

या सर्व उपक्रमांना गावकरी मंडळींचे उत्तम सहकार्य लाभत असून, नवयुवक तरुण मित्र मंडळाच्या या विधायक कार्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

### पोलिसांच्या छाप्यात सहा तलवारीसह आरोपी ताब्यात

**परभणी,/प्रतिनिधी :** पूर्णा पोलीस ठाणे हद्दीतील शासकीय दवाखाना परिसरात राहणाऱ्या एका आरोपीच्या घरावर पोलिसांनी मंगळवारी (दि. २७) अचानक छापा टाकून सहा तलवारींसह आरोपीस ताब्यात घेतले.

पूर्णा पोलीस ठाणे हद्दीत अवैध तलवारींच्या गुप्त माहितीवरून पोलिसांनी पूर्ण शहरातील शासकीय दवाखाना परिसरात राहणाऱ्या पन्नासिंग अर्जु सिंग जुनी याच्या घराजवळील पत्र्याच्या शेडवर अचानक छापा टाकला. या छाप्यात सहा तलवारी आणि तीन खंजीर यासह आरोपीस पोलिसांनी ताब्यात घेतले. या प्रकरणी पूर्ण पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनात आणि अपर पोलिस अधीक्षिक सुरज गुंजाळ यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हा शाखेचे पोलिस निरीक्षक विवेकानंद पाटील, पोलिस उपनिरीक्षक चंदनसिंह परिहार, पोलिस अंमलदार रंगनाथ दुधाटे, सचिन भदर्गे आणि गजानन क्षीरसागर यांनी मिळून केली.

### चितनरवाडी ग्रामस्थांचा जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीवर बहिष्कार

रस्ता-पूल नाही तर मतदान नाही; तहसीलदारांकडे निवेदन

**जिंतूर,/प्रतिनिधी :** तालुक्यातील दुर्गम भागातील चितनरवाडी येथील नागरिकांनी आडगाव ते चितनरवाडी रस्ता व ओढ्यावरील पुलाचे बांधकाम पूर्ण न झाल्याने आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीवर बहिष्कार घातला आहे. रस्ता-पूल नाही तर मतदान नाही अशी ठाम भूमिका ग्रामस्थांनी गुरुवारी (दि. २९) तहसीलदार कार्यालयात उपस्थित राहून निवेदनाद्वारे मांडली.

चितनरवाडी हे गाव आडगाव बाजारापासून अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर असून गेल्या दोन वर्षांपासून गावकरी रस्ता व पुलाच्या मागणीसाठी शासन दरबारी उलगुलान आंदोलन करीत आहेत. या मागणीसाठी मोर्चे, आंदोलने व उपोषण करण्यात आले. शासनाने निधी मंजूर करूनही संबंधित कंत्राटदाराने रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे (थातूर-मातूर) केले असून ओढ्यावरील मुख्य पुलाचे काम अद्याप अपूर्ण ठेवले आहे. परिणामी गेल्या दोन पावसाळ्यांपासून गावातील विद्यार्थी, आजारी व्यक्ती, गर्भवती महिला व गंभीर आजाराने ग्रस्त रुग्णांना तालुक्याच्या ठिकाणी दवाखान्यात पोहोचताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्यात पुलावरून पाणी वाहत असल्याने गावाचा बाहेरील संपर्क पूर्णपणे तुटतो. या परिस्थितीत वेळेवर उपचार न मिळाल्याने गावातील काही आजारी महिलांचा मृत्यू झाल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला आहे.शाळा, अंत्ययात्रा, बाजारपेठ, दवाखाना, शेती व दळणवळण यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याचा आरोप करत गावातील उलगुलान आंदोलकांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड**- तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा**- तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

## महाराष्ट्र राज्याने एक कर्तव्यदक्ष व लोकाभिमुख नेता गमावला- पालकमंत्री मेघना साकोरे

**परभणी,/प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अवघ्या राज्याचे लाडके अजित दादा पवार यांच्या अकस्मित निधनाची बातमी ऐकून मन अक्षरशः सुन्न झालं. एका संवेदनशील, कर्तव्यदक्ष, उत्तम प्रशासक आणि लोकांच्या सुख-दुःखात कायम उभ्या राहणाऱ्या नेत्याच्या जाण्याने खूप मोठी पोकळी निर्माण झाली.

त्यांचा साधेपणा, स्पष्ट बोलणं आणि लोकांशी असलेली आपुलकी आजच्या काळात दुर्मिळ होती. म्हणूनच ते फक्त नेते नव्हते, तर लोकांचा आधार, विश्वास आणि प्रेरणा होते. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून न निघणारी आहे. विधिमंडळात नागपूरच्या अधिवेशनात मी जेव्हा पहिल्यांदा आमदार म्हणून सभागृहात गेले तेव्हा अजित दादा पूर्ण वेळ सभागृहात उपस्थित होते. दादांनी मोठ्या आपुलकीने माझी विचारपूस करून मला शुभेच्छा दिल्या. वडिलांना अभिमान वाटेल असं काम कर असा प्रेमळ सल्ला त्यांनी दिला. आम्ही विरोधी बाकावर असूनसुद्धा कुटुंबातल्या सदस्याप्रमाणे दादा माझ्याशी बोलले. तेव्हापासून ते आज पर्यंत दादांच्या मंत्रिमंडळात सहकारी म्हणून काम करायचं भाग्य मिळालं. पण दादा आज आपल्यामध्ये नाहीत याच्यावर अजूनही विश्वास बसत नाही.

आज पवार कुटुंबीयांवर, दादांच्या सहकाऱ्यांवर आणि लाखो समर्थकांवर कोसळलेल्या या दुःखात आम्ही सर्व सहभागी आहोत. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो आणि परिवाराला हे दुःख सहन करण्याची ताकद प्रदान करो, हीच प्रार्थना.





### श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर महाविद्यालयास रावळे यांच्याकडून ग्रंथ भेट

**जिंतूर,/प्रतिनिधी-** येथील श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर महाविद्यालयास श्री. सुनील सीताराम रावळे यांनी एकून चार हजार एकशे ऐंशी रुपयांचे ग्रंथ भेट दिले. श्री रावळे हे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे परीक्षा विभाग (वाणिज्य) येथे सहाय्यक अधीक्षक पदावर कार्यरत आहेत. क्रमिक अभ्यासक्रम, सामाजिक चळवळ तसेच ललित साहित्याचा समावेश असलेली ही पुस्तके श्री. रावळे यांनी ग्रंथपाल श्री. विनोद भवाळे यांना विद्यापीठ परिसरात सुपूर्त केली.

माणसाच्या जडणघडणीत ग्रंथाचा वाटा फार मोठा असतो. सर्वांना शैक्षणिक, सामाजिक चळवळीची ओळख व्हावी.थोर महापुरुषांचे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावेत व त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास साधला जावा ,हाच उद्देश या ग्रंथ भेटीमागचा असल्याचे



श्री.रावळे यांनी यावेळी सांगितले. यापूर्वीही त्यांनी स्वखर्चाने बऱ्याच महाविद्यालयांना अशा प्रकारचे ग्रंथ भेट दिले आहेत.

यावेळी ग्रंथ भेट देताना त्यांच्यासोबत मा. व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या तथा संचालिका डॉ. एस. एस. मोकाने, अधीक्षक श्री. गणेश कोंडेकर, श्री. अनिल कळसकर, श्री. आशिष डहाळे,श्री. सुनील ढाले, श्री. संदीप कांबळे, श्री. विनायक जाधव, श्री. बळीराम चित्ते, श्री. बालाजी डुकरे, श्री. गजानन हंबर्डे,श्री. संतोष धामणे, श्री.आनंदा हंबर्डे , श्री. अशोक जटाळे, श्री. वाघमारे ही विद्यापीठातील मंडळी उपस्थित होती. संस्था सचिव

सौ. मीनाताई रामप्रसादजी बोर्डीकर यांनी श्री. रावळे यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे विशेष कौतुक करून पुढील वाटचालीसाठी त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.



**जिंतूर- महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादीचे अजित दादा पवार यांचे आज सकाळी नऊ वाजता विमाना अपघातात दुःखद निधन झाले आहे ही वार्ता कळताच परभणी जिल्ह्याच्या लोकप्रिय कार्यसम्राट पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर साकोरे यांच्या संपर्क कार्यालयात त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली आणि त्यांच्या आत्म्यास शांती लाभो अशी जिंतूर येथील भाजपचे कार्यकर्ते तथा जिंतूर तालुका अध्यक्ष गोविंद भाऊ थिटे खेतरे आबा सूनील भोबे पाटील रवी घुगे कैलास खंदारे सुनील मते पिटु माहाजण भास्कर थिटे पिटु भाऊ चव्हाण विजय वाकळे दतराव नवले यासह भारतीय जनता पार्टीचे तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने दिसत आहेत.**

### अवैध वाळूने भरलेला ट्रकटर कार्यवाही न करता तलाठ्याने सोडला

**जिंतूर / प्रतिनिधी-** तालुक्यातील करपरा नदी नदीपत्रातून अवैध वाळू उपसा करून वाहतूक करणारा ट्रकटर तलाठ्याने पकडला व सदरील ट्रकटर चालक मालकांवर कोणतीही कार्यवाही न करता परस्परच सोडून दिल्याने चर्चाना उधाण आले असून या बाबत महसुल प्रशासनाने चौकशी करून कार्यवाही करण्याची मागणी होत आहे.

साठ्याचा लिलाव झालेला नसतानाही या नदी पात्रातून मोठ्या प्रमाणात अवैध रित्या वाळू उपसा होत आहे या बाबत माहिती मिळाल्यानंतर दुधगाव तलाठी शेख खलील हे कौडगाव शिवारात मंगळवार दि २७ जानेवारी रोजी दुपारी बारा ते एक वाजण्याच्या दरम्यान आले असता त्यांना रक वाळूने भरलेला ट्रकटर कौडगाव येथून दुधगाव कडे येतांना दिसला त्यांनी कौडगाव शिवारात संबंधित ट्रकटर चालकास थांबवून त्याच्या ट्राली मधील वाळू वाहतुकी बाबत परवान्याची मागणी केली असता सदरील ट्रकटर चालकाकडे कोणताही परवाना आढळून आला नसल्याने त्यांनी स्वतः ट्रकटर वर बसून तो दुधगाव बायपास रस्त्यापर्यंत आणला त्या ठिकाणी ट्रकटर चालक आल्यानंतर ते ट्रकटर वरून खाली उतरले व संबंधित ट्रकटर मालकांशी अर्थपूर्ण बोलणी झाल्यानंतर त्यांनी अवैध वाळूने भरलेल्या ट्रकटर वर कोणतीही कार्यवाही न करता तो तसाच परस्पर सोडून दिल्याने गावकऱ्यात आश्चर्य निर्माण झाले आहे

#### चौकशी करून कार्यवाही करू :-तहसीलदार शीतल कच्छवे

**या बाबत गावातील जिजाराव दिनकर नागरे,मंगेश सुभाष नागरे,मदन विश्वनाथ नागरे, रामप्रसाद सदाशिव नागरे, यांच्या सह अनेक गावकऱ्यांनी बुधवार दि २८ जानेवारी रोजी सकाळी तहसीलदार शीतल कच्छवे यांची भेट घेऊन त्यांना तलाठी शेख खलील हे ट्रकटर वर बसल्याचे फोटो दाखवत सदरील ट्रकटर परस्पर अर्थपूर्ण बोलणी करून सोडून दिल्याचे सांगितले असता त्यांनी या बाबत चौकशी करून कार्यवाही करू असे सदरील गावकऱ्यांना सांगितले**

## विविध राजकीय पक्षाकडून पालम येथे अजित पवारांना अर्पण केली श्रद्धांजली



**पालम,/ प्रतिनिधी-** महाराष्ट्र राज्याचे लाडके दादा सहकार क्षेत्रातील किंगमेकर राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वसर्वा तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा अपघाती निधन झाल्याची वृत्त कळताच दि.२८ रोजी बुधवारी पालम शहरातील व्यापारी स्फुर्तणे बाजारपेठ बंद ठेवत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली, शहरातील विविध राजकीय पक्षांनीही श्रद्धांजली वाहत त्यांच्या कार्याचा उल्लेख करण्यात आला.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा अपघाती निधन झाल्याचे वृत्त कळताच सकाळी व्यापाऱ्यांनी सकाळ पासूनच बाजारपेठ बंद ठेवत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.यासह शहरातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक गणेशराव रोकडे यांच्या कार्यालयात श्रद्धांजलीचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता, दादांनी तालुक्याच्या विकासासाठी देण्यात केलेला योगदानाबद्दल आवर्जून उल्लेख याप्रसंगी करण्यात आला. यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते वसंतराव सिरस्कर, योगदानाबद्दल उल्लेख केला या वेळी माधवराव गायकवाड, तुषार गोळेगावकर,जिय्या पठाण, सखारामजी हात्तीअंबिरे, शेफ चाऊस, चद्रकात गायकवाड, वैजनाथ हात्तीअंबिरे, सय्यद विखार, अतुल सिरस्कर,भैय्यासाहेब सिरस्कर, पळसकर, स्वामी,पत्रकार मारोती नाईकवाडे,

शांतीलाल शर्मा,राहुल गायकवाड याच्या सह डॉ,असोशन, वकील संघ यासह इतर क्षेत्रातील मान्यवरांनी श्रद्धांजलीचा कार्यक्रम ठेवला होता.

## अंतर्गत वादाच्या भोवऱ्यात सोनपेठ ग्रामीण रुग्णालय

### वैद्यकीय अधीक्षक डॉ.विठ्ठल कराड यांचे उत्कृष्ट काम इतरांना पचेना

**सोनपेठ,/प्रतिनिधी:** सोनपेठ तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाचा अवघ्या काही महिन्यांत कायापालट करणारे कर्तव्यदक्ष वैद्यकीय अधीक्षक डॉ.विठ्ठल कराड सध्या अंतर्गत वादाच्या भोवऱ्यात सापडल्याचे चित्र आहे.

रुग्णालयात शिस्त,पारदर्शकता व रुग्णसेवा सक्षम करण्यासाठी त्यांनी उचललेली पावले काही कर्मचाऱ्यांना जाचक वाटू लागल्याने त्यांच्याविरोधात तक्रारींचे राजकारण सुरू झाल्याची चर्चा तालुक्यात रंगू लागली आहे. डॉ.कराड यांनी पदभार स्वीकारल्यानंतर ग्रामीण रुग्णालयातील अनागोंदी कारभाराला आळा घालत रुग्णसेवा सुधारण्यावर भर दिला.वेळेवर उपस्थिती,उपचारात हलगर्जीपणा टाळणे,औषधसाठ्याचे नियोजन,स्वच्छता,रुग्णांशी सौजन्यपूर्ण वर्तन व दांडी बहाद्दर कर्मचाऱ्यांचा पगार कपात अशा बाबींवर त्यांनी काटेकोर लक्ष दिले.परिणामी काही महिन्यांतच रुग्णालयाचा चेहरामोहरा बदलल्याने रुग्ण व नागरिकांकडून त्यांची प्रशंसा सुरू झाली. दरम्यान,कर्तव्यावर असतानाही काही वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी खाजगी रुग्णालये चालवून शासकीय सेवेकडे दुर्लक्ष करत असल्याच्या तक्रारी येऊ लागल्या. याला आळा बसावा,अधिकारी व कर्मचारी




यांनी आपले शासकीय कर्तव्य प्रामाणिकपणे बजावावे ही स्पष्ट भूमिका डॉ.कराड यांनी घेतली. त्यांनी शिस्तीचे धडे देत कामात कुचराई करणाऱ्यांना सूचना व कारवाईचा इशारा दिला.याच कारवाईचा राग मनात धरून काही सहकाऱ्यांनी राजकीय आडोसा घेत डॉ. कराड यांच्याविरोधात तक्रारी करण्याचा प्रयत्न सुरू केल्याचे बोलले जात आहे. प्रामाणिक सेवा बजावणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी लावून त्यांना मानसिकदृष्ट्या हतबल करण्याचा डाव असल्याची चर्चा कर्मचारी व नागरिकांत सुरू आहे. रुग्णालयातील काही कर्मचाऱ्यांच्या मते,''डॉ. कराड यांनी येताच कामाची शिस्त लावली. आधी मोकळेपणाने गैरहजर राहणाऱ्यांना आता वेळेवर यावे लागते. त्यामुळेच काही लोक अस्वस्थ झाले आहेत.'' तर दुसरीकडे नागरिक म्हणतात, ''आधी उपचारासाठी अडचणी होत्या, आता व्यवस्था सुधारली आहे. चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना पाठबळ देणे गरजेचे आहे.'' सध्या सुरू असलेल्या अंतर्गत वादामुळे रुग्णसेवेवर परिणाम होऊ नये, अशी अपेक्षा तालुक्यातील जनतेतून व्यक्त होत आहे. प्रशासनाने वस्तुनिष्ठ चौकशी करून खऱ्या अर्थाने रुग्णालय सुधारण्यासाठी काम करणाऱ्यांच्या पाठीशी उभे राहावे आणि कामचूकार वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या खाजगी दवाखान्यांची पाहाणी करून त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणीही होत आहे. एकूणच सोनपेठ ग्रामीण रुग्णालयात शिस्त आणि सुधारणा घडवून आणणारे डॉ.विठ्ठल कराड सध्या अंतर्गत राजकारणाच्या विळख्यात अडकले असून, अखेर न्याय कोणाला मिळणार? या प्रकरणाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## अग्रलेख...

# अघटिताचा आघात!

राजकारणाचे क्षेत्र बरेच वादग्रस्त असले तरी या क्षेत्रातील काही व्यक्ती कोणत्या तरी ध्यासाने, ध्येयाने प्रेरित होऊन त्याच्या पूर्ततेसाठी सतत धडपडत असतात. अजित पवार हे राजकारणाच्या पटलावरील त्यापैकीच एक नाव. त्यांच्या दुर्दैवी अस्ताच्या आकस्मिक व धक्कादायक बातमीने महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाच्या मनात अनामिक पोकळीच्या दुःखद जाणिवा तयार झाल्या आहेत. ही पोकळी केवळ एका नेत्याच्या जाण्याच्या वेदनादायी जाणिवेची नाही, तर ती एका आक्रमक, धाडसी, कधी-कधी उद्धट वाटणाऱ्या, पण कायम प्रभावशाली राहिलेल्या राजकीय पर्वाच्या समाप्तीची आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री म्हणून राज्याच्या सत्ताकारणावर आपल्या अस्तित्वाची अमिट मोहर उमटविणारे अजित पवार यांच्या दुर्दैवी अपघाती निधनाचे सर्वांना झालेले दुःख फार बोचरे आहे. नियतीचा खेळ अनाकलनीय असतो असे म्हणतात. त्यापुढे कोणाचेच काही चालत नाही हेही खरेच असते, पण ज्यांच्या असण्याने असंख्यांचे जगणे सोपे होणार असते, ज्यांच्या अस्तित्वामुळे प्रगतीच्या दिशा उजळणार असतात, त्यांनाच काळाच्या पडद्याआड ओढून नियतीने दाखविलेली अनाकलनीयता मात्र क्रूरच ठरते.

अजित पवार म्हणजे सत्तेच्या केंद्रस्थानी राहण्याची दुर्दम्य आकांक्षा! निर्णयांतील वेग, भाषणातील धार, प्रशासकीय कामकाजावरील पकड आणि प्रसंगी राजकीय संकेत झुगारून, कागदावरच्या नियमांना बगल देऊन केलेली थेट कृती ही त्यांची कार्यशैली महाराष्ट्राला कायमच भावली. त्यामुळेच ते नेहमीच चर्चेत राहिले. ही चर्चा अनेकदा उलटसुलटदेखील होती. त्यांच्या कृतिशील स्वभावामुळे जेव्हा राज्याच्या हिताचे प्रश्न सहजपणे सोडविले गेले, तेव्हा ते कौतुकाचे धनी ठरले आणि कधी त्यांच्या काही निर्णयांवर टीकेचे प्रहारही झाले. स्वभावाने सच्चा असलेल्या या नेत्याने कधीही 'लोकानुनय' केला नाही. रोखठोक स्वभाव, परखड भाषा आणि अप्रिय असले तरी सत्य बोलण्याचा धाडसी स्वभाव असलेला हा नेता सत्तानिष्ठ होता. सत्तेशिवाय समाजाचे हित साधताच येणार नाही, अशा ठाम धारणेमुळेच असावे कदाचित, सातत्याने सत्तेच्या सहवासात राहण्यासाठी त्यांनी प्रसंगी वैचारिक भूमिका बदलल्या. अनेकदा त्यांनी पक्षीय धोरणांना बगल दिली आणि थेट वारसादेखील नाकारण्याचे धाडस दाखविले. स्वतंत्र मार्गावरून चालत राजकारण करण्याची हिंमतही दाखविली. महाराष्ट्राच्या राजकारणात सत्ता ही केवळ पदाने नव्हे, तर प्रभावाने मोजली जाते, हे त्यांनी पुन्हा पुन्हा सिद्ध केले.

नेतृत्वाच्या संधी हिरावल्या जात असल्याचे खदखदते शल्य उराशी जपून ठेवणे एका टप्प्यावर अवघड झाले, तेव्हा शरद पवारांच्या राजकीय संस्कारांची सावली झुगारून त्यातून बाहेर पडण्याचा निर्णय अजितदादांसाठी सोपा नव्हता. भविष्यातील प्रवासात कोणते अडथळे असतील, कोणत्या संधी असतील आणि कोणत्या अडथळ्यांवर मात करून कोणत्या संधीचे सोने करता येईल, याबाबत कोणतीच निश्चिततादेखील नव्हती. शरद पवारांच्या सावलीतच राहण्यासाठी असंख्य राजकीय नेते धडपडत असतानाच्या काळात, आता आम्ही स्वतंत्रपणे निर्णय घेण्याच्या क्षमतेचे झालो आहोत, असे ठणकावून सांगत स्वतःची वाट आखू पाहणारे अजित पवार हे वेगळे रसायन आहे, याची जाणीव महाराष्ट्राला झाली. शरद पवारांचे नेतृत्व झुगारण्यासाठी अगोदर कोणत्याही नेत्यास आपल्या नेतृत्वाचे वेगळे वलय निर्माण करावे लागते, असा तो काळ. अन्यथा, अनेक नेत्यांना सहजपणे कात्रजचा घाट दाखविला जात असे. अशा काळात अजित पवार मात्र आपली भूमिका अधिक टोकदार करून त्या सावलीतून बाहेर पडले आणि अधिक तीक्ष्ण व व्यवहारी झाले. शरद पवारांच्या चाणाक्ष राजकारणाचा वारसदार म्हणून पाहिले जाणे अधिक सोयीचे, की स्वतंत्र निर्णयक्षमता संपादन केलेला समाजमान्य नेता म्हणून उभे राहणे अधिक सोपे या द्वंद्वात त्यांनी घेतलेले काही निर्णय वादग्रस्त होते खरे, पण ते दुर्लक्ष करण्यासारखे कधीच नव्हते. राष्ट्रवादी काँग्रेसची फाळणी करून शरद पवार यांच्या नेतृत्वाच्या सावलीतील पक्षाचे चिन्ह, झेंडा आणि मूळ पक्षावरच हक्क सांगणे असा धक्कादायक प्रयोग त्यांनी केला. ज्या विचारसरणीचा विरोध करणारे राजकारण त्यांनी कायम केले, त्याच विचारसरणीसोबत जाऊन सत्तेच्या नव्या मांडामांडीत उडी घेणे आणि 'व्यवहार्य राजकारण' सांभाळणेही त्यांना जमले. वैचारिक मतभेदापलीकडे जाऊन राज्यहिताची भूमिका सातत्याने आग्रहीपणे मांडण्याच्या स्वभावातून त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात नैतिकतेपेक्षा वास्तवाला अधिक महत्त्व देणारी भूमिका ठसठशीतपणे दाखवून दिली.

अजित पवार नावाच्या एका झंझावाताच्या अस्ताचा आघात महाराष्ट्राला सहन होणारा नाही. अजितदादा हे लोकानुनयी निर्णय घेऊन जनतेला स्वप्नांच्या दुनियेत रमविणारे राजकारण करणारे किंवा टीकाटोमण्यांच्या भावनिक आवाहनांनी जनसमुदायासमोर रडगाणे गाणारे नेते नव्हते. त्यांची राजकीय गणिते पक्की होती. बेरजेच्या, वजाबाकीच्या गणितांची उत्तरे अगोदर मांडून त्यानुसार ती गणिते आखणारे ते निष्णात गणिती होते. मतदारसंघ, जातीय समीकरणे, निधीवाटप, प्रशासनावर पकड, निर्णयाचे परिणाम किंवा दुष्परिणाम या सगळ्यांचा ते थंड डोक्याने हिशेब मांडत. त्यामुळेच अनेकांना ते 'कठोर' वाटले, तर काहींना हा त्यांच्या 'कार्यक्षमते'चा पुरावा वाटला. काहींच्या लेखी त्यांचे राजकारण 'अस्वस्थ करणारे' देखील होते. त्यांचे राजकारण निष्प्रभ मात्र कधीच ठरले नाही. म्हणूनच, सत्ता कोणाचीही असो, सत्तेवर कोणताही पक्ष असो, अजित पवार कायम सत्तेच्या केंद्रस्थानी राहिले आणि महाराष्ट्राच्या अर्थकारणावरही त्यांचा प्रभाव राहिला.

अजित पवार यांच्या पश्चात महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक नवी वळणे येऊ शकतात, असे मानले जात आहे. त्यांच्या नसण्यामुळे राजकारणात आणि महाराष्ट्राच्या वर्तमानकाळात भासणारी पोकळी ही आक्रमक राजकारणशैलीच्या संदर्भातील असेल. राज्याच्या हितासाठी सत्ता असणे गरजेचे आहे, असे ठामपणे ठणकावून, शरद पवार यांच्या सावलीतून बाहेर पडणारा आणि सत्तेच्या राजकारणातील सर्वांत मोठा धोका पत्करणारा नेता गमावल्याने, महाराष्ट्राच्या राजकारणातील नव्या वाटा कोणत्या दिशेला घेऊन जाणार याविषयी आता चर्चादेखील सुरू होईल. अजित पवार यांच्या अलिकडच्या राजकारणातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या दुभंगलेल्या वाटांवरून चालणारे वाटसरू पुन्हा एका वाटेवर येतील अशी चर्चा सुरू झाली होती. तसे राजकीय संकेतही मिळू लागले होते. आता त्याचे काय होणार हा राजकारणाचा प्रश्न झाला. त्याचे उत्तर राजकारणातच मिळेल. मात्र, महाराष्ट्राने एक क्षमतावान नेतृत्व गमावले असल्याची आणि ती पोकळी भरून निघणे शक्य नसल्याची जाणीव महाराष्ट्रास झाली आहे, एवढे खरे! मराठा राजकारण, राज्यातील सहकार चळवळ, पश्चिम महाराष्ट्राचा सत्ताकेंद्रित पट या सगळ्यांवर अजित पवारांची पकड होती. आता हे सगळे पट नव्याने मांडले जातील. महायुती नावाच्या एका आगळ्या राजकीय सत्ताकारणात सहभागी झालेले अजित पवार हे सत्तापक्षाकरिता कधी सोयीचे भागीदार ठरले, तर कधी अस्वस्थ करणारे सहप्रवासीदेखील ठरले. त्यांच्या नसण्याने सत्तेची गणिते सोपी होतील की अधिक गुंतागुंतीची, हा प्रश्नही आहेच. आज मात्र, अजित पवार यांचे निधन ही महाराष्ट्राची हानी आहे, हेच खरे. या अनाकलनीय आघातामुळे महाराष्ट्र एका संक्रमणाच्या टप्प्यावर उभा ठाकला आहे. या राज्यात भावनिक नेतृत्व आहे, आंदोलनातून उभे राहिलेले नेतृत्वदेखील आहे. पण प्रसंगी थेट सत्ताकेंद्रावर घाव घालणाऱ्या नेतृत्वाची उणीवही महाराष्ट्राने अनुभवली आहे. अजित पवार यांच्या नसण्याने ही उणीव अधिक ठळक झाली आहे. अजित पवार हे 'आदर्शवादी' नेते नव्हते, अशी टीका केली जाते. ती काही अंशी खरीदेखील आहे. पण अनेकदा आदर्शवादाने नव्हे, तर ताकदीमुळेच राजकारणाची दिशा बदलते, हेही तितकेच खरे आहे. अजितदादांच्या राजकारणाने अनेक प्रश्न निर्माण केले, अनेक प्रस्थापित मूल्यांवर आघातही केला. पण त्याच वेळी निर्णयक्षमतेचा ठोस निकषही त्यांच्या नेतृत्वाने उभा केला. अजितदादा यांच्या नसण्यामुळे हा निकष कमजोर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. कदाचित, अजित पवार यांची नोंद भविष्यातील इतिहासात बंडखोर नेता म्हणून केली जाईल. कदाचित त्यांच्या राजकारणावर व्यवहारवादाचा शिक्कादेखील मारला जाईल. कदाचित, ही सगळीच अजित पवार यांची वैशिष्ट्ये म्हणूनही सांगितली जातील. पण असे असूनही, अजित पवार यांचे असणे आणि नसणे यातील फरक सर्वांना अंतर्मुख करणाराच असेल. त्यांची वेगळी ओळख कधीच पुसली जाणार नाही. म्हणूनच, त्यांच्या नसण्याची वेदना महाराष्ट्राच्या राजकीय विश्वासह साऱ्यांना अस्वस्थ करणारी आहे. 'तरुण भारत' परिवारातर्फे अजित पवार यांच्या स्मृतीस विनम्र श्रद्धांजली.

## श्रद्धांजली


नितीन गडकरी

# राजकारणापलीकडचे मैत्र

अजितदादांची आणि माझी मैत्री ही राजकीय मतभेदांच्या पलीकडची होती. आम्ही अनेक वर्षे विधिमंडळात काम केले. एकमेकांवर राजकीय टीका-टिप्पणी केली. परंतु, आमच्या मैत्रभावात अंतर आले नाही. जनहिताच्या मुद्यावर मी काही आग्रह केला आणि तो अजितदादांनी मान्य केला नाही, असे घडले नाही. आणि दादांनी एखादा असा लोकहिताचा विषय माझ्यासमोर ठेवला तर तो मी सकारात्मक पद्धतीने सोडवण्याचा प्रयत्न केला नाही, असेही घडले नाही. आमची मैत्री राजकारणविरहित होती.

पश्चिम महाराष्ट्रातील विकसित सहकार क्षेत्रातून जे काही मोठे राजकीय नेते पुढे आले, त्यात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे नाव महत्त्वाचे आहे. गेली तब्बल चाळीस वर्षे अजितदादा राजकारणात, सार्वजनिक जीवनात कार्यरत होते. राज्यातील विविध खात्यांचे मंत्री म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. आजही ते सतत आणि अथक कार्यरत होते. महाराष्ट्राच्या विकासाचा त्यांना ध्यास होता. राजकीय नेत्यांना लोकांना, कार्यकर्त्यांना सांभाळावे लागते. त्यामुळे सातत्याने गोड बोलावे लागते. किंबहुना आपण स्पष्ट बोललो तर चुकीचा संदेश जाईल, असे अनेकांना वाटते. अजितदादा मात्र या रीतीला अपवाद होते. ते उत्तम प्रशासक होते, तसे ते स्पष्टवक्तेही होते.

मला त्यांचा स्पष्टवक्तेपणा फार आवडायचा. ज्या कामाबद्दल त्यांचे मत सकारात्मक असेल, त्याबद्दल ते तसे स्पष्टपणे सांगत. जे काम होऊ शकत



नसेल, त्याबद्दल तसेही स्पष्टपणे सांगून मोकळे होणे हा त्यांचा स्वभाव होता. मात्र, त्यांनी एखाद्या कामाला होकार दिला असेल तर त्याचा पाठपुरावा करून ते शेवटाला नेण्यापर्यंतची जबाबदारी अजितदादा घेत, हे मी कित्येकदा अनुभवले आहे. त्यांच्या या नेतृत्वगुणामुळे त्यांच्याबद्दल शासन-प्रशासनात एक विश्वास निर्माण झाला. प्रशासनावर चांगली पकड ठेवून जनतेच्या हिताचे नेमके निर्णय करून घेत असताना त्यांची निर्णयक्षमता वेळोवेळी सिद्ध झाली. शिवाय त्यांची लोकाभिमुखताही अधोरेखित झाली. महाराष्ट्राच्या विकासात त्यांचे चांगले योगदान राहिलेले आहे.

केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्री म्हणून महाराष्ट्रात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या वतीने कामे करीत असताना मला त्यांच्या कार्यशैलीचा अनुभव आला. विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात पुणे जिल्हा, सातारा जिल्हा आणि अन्य संबंधित भागात पालखी मार्ग किंवा अन्य कामे करताना भूसंपादनासह अनेक प्रकारच्या अडचणी आल्या. परंतु, महाराष्ट्राचा विकास होत आहे हे लक्षात ठेवून या सगळ्या कामांना त्यांनी स्वतः संपूर्ण ताकदीने पाठबळ दिले. सहकार्य दिले. या सर्व कामांमध्ये त्यांचे खूप मोठे सहकार्य मिळाले, याचा विशेषत्वाने उल्लेख केला पाहिजे.

राजकारणात कधी जमते, कधी जमत नाही. कधी पार्टी सोबत असते, कधी नसते. ते बघून आम्ही मैत्री केली नाही. त्यामुळे सत्तेत असो वा नसो, त्यांचे व माझे संबंध पूर्वी होते, तसेच ते आज अखेरच्या क्षणापर्यंत होते. राजकीय पदे आणि भूमिका बाजूला ठेवून वैयक्तिक स्तरावरील मैत्रभाव आम्ही दोघांनीही एकमेकांबद्दल जोपासला हे मला अधिक महत्त्वाचे वाटते.

अजितदादा पवार हे माझे राजकारणातले आणि राजकारणाच्या पलीकडले उत्तम मित्र होते. ज्येष्ठ नेते शरद पवार यांचा वारसा त्यांनी चांगला चालवला. सुखी, संपन्न, समृद्ध महाराष्ट्र घडवण्याची ताकद त्यांच्याकडे होती. एका दमदार, दिलखुलास आणि कमालीची निर्णयक्षमता असलेल्या नेत्याला आपण सारे मुकलो आहोत. त्यांचे व माझे कौटुंबिक संबंध होते, त्यामुळे अजितदादांचे अचानक निघून जाणे ही माझ्यासाठी एक व्यक्तिगत हानी आहे.

**भावपूर्ण श्रद्धांजली!**

(केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री, भारत सरकार)

## वेध

नंदकिशोर काथवटे

# पराक्रमाची पताका

प्रजासत्ताक दिन हा केवळ सोहळ्यांचा किंवा औपचारिक सन्मानांचा दिवस नसून, देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी प्राणपणाने लढणाऱ्या शूर जवानांच्या त्यागाची आठवण करून देणारा दिवस आहे. याच पृष्ठभूमीवर यंदाच्या प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला गडचिरोली पोलिस दलाने मिळवलेला सन्मान हा केवळ एका जिल्ह्यापुरता मर्यादित नसून संपूर्ण देशासाठी गौरवाचा विषय ठरतो. देशभरात जाहीर झालेल्या १२१ पोलिस शौर्यपदकांपैकी तब्बल ३१ शौर्यपदके गडचिरोली पोलिस दलाला मिळाली असून, त्यामुळे गडचिरोलीने देशात दुसरा क्रमांक पटकावला आहे. नक्षलवादग्रस्त म्हणून देशभरात ओळखल्या जाणाऱ्या गडचिरोली जिल्ह्याने आज आपल्या ओळखीचा इतिहास बदलला आहे. कधीकाळी भीती, बंदूक आणि स्फोटांची छाया असलेला हा जिल्हा आज शौर्य, नियोजन आणि पोलिस दलाच्या शिस्तबद्ध कारवाईमुळे देशाच्या पटलावर सकारात्मक उदाहरण म्हणून उभा राहिला आहे.

२२ एप्रिल २०१८ रोजी बोरीया-कसनसूर येथे झालेल्या ऐतिहासिक चकमकीत ४० माओवाद्यांना ठार मारण्यात गडचिरोली पोलिसांना मिळालेले यश हे केवळ एक लष्करी यश नव्हते, तर नक्षल चळवळीच्या कणाकणावर घाव घालणारी निर्णायक कारवाई होती. या चकमकीत सहभागी असलेल्या पोलिस अधिकारी व जवानांनी दाखवलेले धैर्य, प्रसंगावधान आणि बलिदान आज शौर्यपदकांच्या रूपाने गौरवले जात आहे. पोलिस निरीक्षक अमोल फडतरे, सहायक उपनिरीक्षक वासुदेव मडावी, मधुकर नैताम, पोलिस नाईक संतोष नैताम, विश्वनाथ सडमेक, बिटाजी वेलाडी, करे उरपा आत्राम यांच्यासह अनेक जवानांनी जीव धोक्यात घालून देशाच्या सुरक्षेसाठी लढा दिला. काही जवानांनी तर आपले प्राण अर्पण करून कर्तव्याची सर्वोच्च पातळी गाठली. त्यांच्या बलिदानामुळेच आज गडचिरोलीचा चेहरा बदलताना दिसतो आहे. या शौर्याच्या जोडीला गडचिरोली पोलिस दलात झालेल्या ३९४ पदोन्नती हा देखील तितकाच महत्त्वाचा टप्पा आहे. वेगवर्धित पदोन्नती, तसेच हुतात्मा पोलिस जवानांच्या कुटुंबीयांना देण्यात आलेल्या पदोन्नती या निर्णयातून शासन आणि प्रशासनाचा संवेदनशील दृष्टिकोन दिसून येतो. केवळ शौर्यालाच नव्हे, तर प्रामाणिक सेवेची दखल घेणारी ही प्रक्रिया पोलिस दलाचे मनोबल वाढवणारी आहे. महत्त्वाचे म्हणजे गडचिरोली पोलिसांनी नक्षलवादाविरोधातील लढा केवळ बंदुकीच्या जोरावर लढलेला नाही. सोशल पोलिसिंगच्या माध्यमातून आदिवासी समाजात विश्वास निर्माण करणे, त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि नक्षल चळवळीची वैचारिक मुळे कमकुवत करणे, हा या लढ्याचा खरा पाया ठरला आहे. पोलिस अधीक्षक निलोत्पल यांच्या मार्गदर्शनाखाली सी-६० पथकाने अतिदुर्गम व नक्षलप्रभावित भागात पोलिस चौक्या उभारून नक्षल्यांची मुस्कटदाबी केली. बिना गुंडा परिसरात उभारलेली पोलिस चौकी ही केवळ प्रशासकीय रचना नसून, राज्याच्या उपस्थितीचे आणि सुरक्षेच्या विश्वासाचे प्रतीक आहे. गडचिरोली पोलिसांच्या या कामगिरीकडे केवळ शौर्यपदकांच्या आकड्यांतून पाहणे ही मोठी चूक ठरेल. कारण हा लढा बंदुकीपेक्षा जास्त विश्वासाचा, संयमाचा आणि सातत्याचा आहे. नक्षलवादाला रोखताना पोलिसांनी केवळ हिंसाचाराचे उत्तर हिंसाचाराने दिले नाही, तर विकास, सुरक्षा आणि संवाद या तीन पायांवर उभी राहणारी नवी व्यवस्था निर्माण केली. आज गडचिरोलीत उभा राहत असलेला शांततेचा नवा अध्याय हा सहज घडलेला नसून, तो पोलिस जवानांच्या घाम, रक्त आणि बलिदानातून घडलेला आहे. म्हणूनच हा पराक्रम सन्मानापुरता न ठेवता, तो धोरणांचा भाग बनवणे हीच खरी राष्ट्रसेवा ठरेल. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी २०२६ पर्यंत संपूर्ण देश नक्षलमुक्त करण्याचा संकल्प जाहीर केला आहे. त्या संकल्पाच्या दिशेने गडचिरोली पोलिसांनी उचललेली पावले आज प्रत्यक्षात परिणाम देताना दिसत आहेत. नक्षलवादाच्या अंधारातून बाहेर पडत असलेला गडचिरोली जिल्हा हा देशातील इतर नक्षलप्रभावित भागांसाठी मार्गदर्शक ठरू शकतो. प्रजासत्ताक दिनी मिळालेली ही शौर्यपदके केवळ सन्मानचिन्ह नाहीत, तर गडचिरोली पोलिसांच्या रक्त, घाम आणि बलिदानाची पावती आहेत. दुर्गम जंगल, अवघड भौगोलिक परिस्थिती आणि सततचा जीवघेणा धोका असूनही पोलिस जवानांनी कर्तव्याशी तडजोड केली नाही. शासन, प्रशासन आणि स्थानिक नागरिक यांच्यातील समन्वयातून उभा राहिलेला हा विश्वासाचा पूल नक्षलवादाच्या विरोधातील लढ्यात निर्णायक ठरत आहे. गडचिरोलीचा हा अनुभव देशातील इतर नक्षलप्रभावित भागांसाठी दिशादर्शक ठरू शकतो.

९९२२९९९५८८

## नोंद

अशोक चौसाळकर

# उमदा राजकारणी, कठोर प्रशासकाचा अस्त

राज्यातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचा हंगाम सुरू होत असतानाच एक वाईट बातमी येऊन धडकली आणि राज्यातील राजकारण्यांसह जनतेलाही मोठा धक्का बसला. या निवडणुकांच्या प्रचाराचा धडाका सुरू करण्यासाठी सर्व पक्ष सज्ज होत असताना, सकाळी लवकर उठून कामाला सुरुवात करण्याची ख्याती असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार बारामतीमध्ये पहिली प्रचारसभा घेण्यासाठी मुंबईहून विमानाने पहाटेच बारामतीला जायला निघाले. प्रचारसभेची वेळ सकाळी साडेनऊची होती. पण विमानाच्या 'लॅण्डिंग'मध्ये काही तरी तांत्रिक समस्या निर्माण झाली आणि हे विमान बारामतीजवळच एका दरीत कोसळले. हे विमान ५०० फूट उंचीवरून कोसळल्यामुळे कोणी वाचण्याची शक्यता फारच धूसर होती. त्यानुसार विमानात बसलेल्या अजित पवार यांच्यासह इतरांचा दुर्दैवी मृत्यू झाला. पुढील तपासानंतर अपघाताचे नेमके कारण समोर येईल, हा अपघात टाळता आला असता का, यावर ऊहापोह होईल, पण या अपघातात राज्याने एक उमदे नेतृत्व गमावले आहे, हे वास्तव बदलू शकणार नाही. अजित पवार यांना उभा महाराष्ट्र एक उमदे व्यक्तिमत्त्व, शिस्तबद्ध राजकारणी आणि झटून काम करणारा नेता म्हणून ओळखतो. काका शरद पवार यांच्या छत्रछायेत राजकारणाचे धडे गिरवताना त्यांनी पक्षात, प्रशासनात आणि राज्यातील जनतेच्या मनात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले होते. १९९१ च्या विधानसभा निवणुकीमध्ये ते सर्वप्रथम आमदार म्हणून निवडून आले आणि त्यांनतर आजपर्यंत सलग सात वेळा बारामतीकरांनी त्यांना आमदार म्हणून निवडून दिले. त्यांनी राज्याचे उपमुख्यमंत्रिपद आणि अर्थमंत्रिपद अनेकदा भूषवले.

राज्याच्या राजकारणामध्ये गेली २५ वर्षे अजित पवार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. कर्तबगार मंत्री, कठोर प्रशासक म्हणून ओळखले जाणारे अजित पवार यांनी आर्थिक शिस्त अंगी बाणवली होती. महाराष्ट्राच्या अर्थकारणाचा आवाका त्यांच्या लक्षात आला होता. त्या जोरावर त्यांनी राज्याच्या अर्थ मंत्रालयाची धुरा यशस्वीपणे सांभाळली. महाराष्ट्राच्या ग्रामीण राजकारणामध्ये अजित पवार यांची भूमिका महत्त्वाची होती. त्यांनी शरद पवार यांच्यापासून वेगळे होऊन भारतीय जनता पक्षाशी युती केली तरी राष्ट्रवादी काँग्रेसचे वैचारिक वेगळेपण गमावले नाही. निवडणुकांमध्ये जय-पराजय होत असतात, पण अजित पवार यांच्याकडे नेहमीच जनाधार होता. गेल्या वर्षीच्या विधानसभा निवडणुकांमध्ये त्यांनी चांगले यश मिळवले. या निवडणुकांमध्ये दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांनी मिळून (शरद पवार गट आणि अजित पवार गट) एकूण २१.५ टक्के मते मिळवली होती, ही बाब दुर्लक्षित करता येणार नाही. पुढे या दोन्ही पक्षांचे विलीनीकरण झाल्यानंतर २० ते २१ टक्के लोकांचा पाठिंबा असणारा हा पक्ष असणार होता. पुढील काळात महाराष्ट्राच्या राजकारणात अजित पवार अतिशय महत्त्वाची भूमिका बजावणार होते. पण दुर्दैवाने त्यांचा अकाली मृत्यू झाल्याने या सर्व शक्यता कागदावरच राहिल्या.

यापूर्वी विमान आणि इतर अपघातांमध्ये अनेक नेत्यांचे मृत्यू झाले आहेत. या नेत्यांच्या मृत्यूंमुळे राजकारणाची दिशा बदलल्याचे आपण पाहिले आहे. संजय गांधी, माधवराव शिंदे, आंध्र प्रदेशचे कर्तबगार माजी मुख्यमंत्री राजशेखर रेड्डी यांचे मृत्यू विमान अपघातांमध्येच झाले होते. तत्कालीन केंद्रीय कृषी मंत्री आणि महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे यांचा मृत्यू वाहन अपघातात झाला होता. या सर्वांच्या मृत्यूनंतर त्या त्या राज्याच्या किंवा देशाच्या राजकारणात बदल झाल्याचे आपण पाहिले आहे. आता अजित पवार यांच्या मृत्यूनंतर राज्याच्या राजकारणाची दिशाही बदलण्याची चिन्हे आहेत.

अलिकडच्या काळात अजित पवार आणि शरद पवार यांची जवळीक वाढत होती. राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये दोन्ही राष्ट्रवादी पक्षांची युती झाल्याचे आपण पाहिले. आता जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठीही हे दोन्ही पक्ष एकत्र आले आहेत. या निमित्ताने अजित पवार भारतीय जनता पक्षाशी असलेल्या युतीतून बाहेर पडून काकांबरोबर जाणार का, असा प्रश्न पुढे येत होता. अर्थात दोन्ही राष्ट्रवादी पक्षांची जवळीक वाढत असली तरी अजित पवार युतीतून बाहेर पडले असते, असे वाटत नाही. युतीबरोबर राहूनही ते स्वतःचे वेगळे अस्तित्व टिकवणार होते आणि त्याच वेळी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीशी जवळीक राखणार होते.

अजित पवार यांची प्रशासनावर घट्ट पकड होती याची अनेक उदाहरणे दिली जातात. त्याचबरोबर एखाद्याला शब्द दिला की तो पूर्ण करण्यासाठी ते जातीने लक्ष घालून काम करून द्यायचे, याचेही अनेक किस्से सांगितले जातात. असाच एक किस्सा मला आठवतो. अजित पवार यांचे महाविद्यालयीन शिक्षण कोल्हापूरच्या शहाजी कॉलेजमध्ये झाले होते. त्यामुळे त्यांचे कोल्हापूरवर आणि कॉलेजजवळ असलेल्या रंकाळा तलावावर विशेष प्रेम होते. मागे एकदा रंकाळा तलावात केंजाळ नावाची वनस्पती मोठ्या प्रमाणावर वाढली होती. ती पाहिल्यावर त्यांना वाईट वाटले आणि त्यानी संबंधितांना हा तलाव दोन दिवसांमध्ये स्वच्छ करून देतो, असे आश्वासन दिले. त्यानंतर त्यांनी खरोखरच सर्व यंत्रणा कामाला लावून दोन दिवसांमध्ये तलाव स्वच्छ करून दिला. अजित पवार हे एक धडाडीचे नेते होते, सर्वसामान्य कार्यकर्त्यांमध्ये ते सहज मिसळत होते. त्यांचा कोणताही अभिजनवादी दृष्टिकोन नव्हता. त्यामुळेच ते जनमानसात लोकप्रिय होते. या संदर्भातील पवार कुटुंबाची परंपरा त्यांनी जपली होती.

गेल्या विधानसभा निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी पक्षांना मिळून २१.५ टक्के मते खेचता आली होती. मग सत्तेत राहून स्वतःचे वेगळेपण कायम ठेवून (शरद पवार यांच्या पक्षाशी जवळीक साधून) ही २१ टक्के मते आपल्याकडे कशी ठेवता येतील याचा विचार अजित पवार करत होते. पुढील काळात त्यांचे भारतीय जनता पक्षाशी वाद झाले असते तर ते युतीतून बाहेरही पडले असते. पण लगेच युतीतून बाहेर पडण्याचा त्यांचा विचार असेल, असे मला वाटत नाही.

आता दोन्ही राष्ट्रवादी पक्षांसमोर एक मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. शरद पवार यांचे वय बरेच झाले आहे. अजूनही कार्यरत असले तरी आता ते पूर्वीप्रमाणे तडफेने काम करू शकत नाहीत, हे सत्य आहे. त्यातच अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांचा पक्षही नेतृत्वहीन झाला आहे. राज्यातल्या या महत्त्वाच्या पक्षापुढे आता नवे, सक्षम नेतृत्व निर्माण करण्याचे आव्हान आहे. अजित पवार यांच्या दुर्दैवी मृत्यूमुळे आता कदाचित दोन्ही राष्ट्रवादी पक्ष एकत्र येण्याची प्रक्रिया सुरू होईल. त्यात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे पुढील काळात सरकारमध्ये राहायचे की नाही याबाबत सुरू झालेली चर्चा. पण माझ्या मते हा पक्ष सरकारमध्ये राहील. त्यानंतरचा प्रश्न म्हणजे अजित पवार यांच्या जागी योग्य नेतृत्व देऊ शकेल असा सर्वमान्य नेता शोधणे. अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांच्याकडे नेतृत्व जाते की आणखी कोणाकडे, हे आता पाहावे लागणार आहे.

पुढील काळात 'पॉलिटिकल रिअलाईनमेंट्स' होण्याची शक्यता असून महायुतीतील अंतर्गत संघर्ष आणि स्वतःचे अस्तित्व प्रस्थापित करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने काय भूमिका घ्यावी यावर त्या पक्षाच्या नेत्यांमध्ये होणारे विचारमंथन आणि त्यातून निर्माण होणारे नवे आडाखे हे मुद्दे हळूहळू स्पष्ट होत जातील. अर्थात त्यासाठी आपल्याला थोडी वाट पाहावी लागेल. अजित पवार यांच्या निधनामुळे त्यांच्या पक्षात आणि राज्याच्या राजकारणात एकूणच मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यामुळे पुढे काय घडामोडी घडतात यावर बरेचसे राजकीय विश्लेषक लक्ष ठेवून आहेत.

(लेखक राजकीय विश्लेषक आहेत.)

## अलविदा दादा...

माझे नुकतेच दोनदा बारामतीत जाणे झाले. मुक्कामी राहता आले. यानिमित्ताने मला अजितदादा आणि अजितदादांची 'दादागिरी' खऱ्या अर्थाने अनुभवता आली. रस्त्यांची डागडुजी असू दे, पेयजलाच्या पाईपलाईनकरिता रस्ते खोदण्याचे काम असू दे की तुंबलेली ड्रेनेज सिस्टिम असू दे, बारामतीत कुठंही हिंडा, सारे काम त्वरेने आणि वेळेत पूर्ण झालेली असतील. केलेल्या कामाचे कोणतेही अवशेष अर्थात दगड-विटा-गिट्टी-मलबा असं काहीही इतस्ततः पडलेले दिसणार नाही, यावर अजितदादांचा कटाक्ष होता. व्यवस्था राबवायला दम लागतो. तो दम दादांच्या व्यक्तिमत्त्वात होता.

शनिवारी-रविवारी मतदारसंघात राहायचे, लोकसंपर्क करायचा, हे दादांनी थोरल्या पवार साहेबांकडूनच अंगीकारले. सकाळी सहा-साडेसहाला अजितदादा संबंधित सर्व अधिकाऱ्यांसह मतदारसंघात दौऱ्यावर निघायचे. कामाची सगळी टिपणे, बातम्यांच्या कात्रणांसह दादांच्या हातात मी बघितली आहेत. स्पॉटवर पोहोचल्याबरोबर पंचनामा सुरू. काय बिशाद प्रशासकीय अधिकाऱ्यांची कारणं सांगायची! सगळी प्रशासकीय पलटण दादांसमोर चळचळा कापायची. बोलताना दादा संयमी जरूर असायचे, पण दादांच्या बोलण्यात वचक, धाक जबरी असायचा. दादा हिशेब मागायचे ते जबाबदारीचा. बारामतीतील बसस्थानक, सार्वजनिक उपयोगाची ठिकाणे, ज्येष्ठ नागरिकांकरिता बागेत किंवा फूटपाथवर असलेली आसन व्यवस्था, चौकांचे सौंदर्यीकरण, खेळाची मैदाने, परिसरातल्या शिक्षण संस्था, कृषी प्रयोगशाळा, संशोधन केंद्रे बघितले आणि बारामती परिसरातल्या जनतेची अजितदादा किंवा थोरल्या पवार साहेबांविषयची कृतज्ञता कळायची. आज सकाळी दुर्दैवी अपघात झाला. बारामतीत पोहोचण्याकरिता दादांनी विमानात पाऊल ठेवले खरे, पण बारामतीच्या भूमीवर त्यांना पाऊल ठेवता आले नाही. त्यापूर्वीच त्यांचे विमान क्षतिग्रस्त झाले आणि अजितदादांचा करुण अंत झाला. त्यांना अलविदा म्हणताना दुःखाचे कढ कुणालाच आवरणार नाहीत. दादांच्या स्मृतींना आदरांजली.

**डॉ. पिनाक दंदे**/
अध्यक्ष, डॉ. दंदे फाऊंडेशन, नागपूर

## वाचक पत्रे

### अजितदादा, मनाला कसं समजावू?

आज २०२६ जानेवारीची २८ तारीख बुधवार दिवस सकाळी मृण्मयी माझी सूनबाई म्हणते, "बाबा, अजितदादा पवार विमान अपघातात मृत्युमुखी पडले." "अगं खोटं बोलतेस तू?" ती म्हणाली, "दूरदर्शनवर बातम्या बघा?" दादा, खरंच तुमच्या अपघाताची दृश्ये बघवली जात नव्हती. महाराष्ट्राच्या राजकारणातला कर्तृत्ववान चेहरा, शासकीय यंत्रणेवर दबाव ठेवून जनहितासाठी शासन राबवणारा खराखुरा राजकारणी, अनेक संकटांना, मोठ्या हिमतीने आणि कल्पकतेने त्यांना थोपवत लोकहित साधणारा नेता, अनेकांच्या कल्पनेच्या बाहेरचे आपले कर्तृत्व संपूर्ण जगाने अनुभवले. अजितदादा, पवार कुटुंबाचे एक वलय आपल्या पाठीशी होते, हे सत्य जरी असले तरी आपल्या सेवाकार्यात संत विचारांचा वसा होता.

दादा, माझ्या स्मरणात आपल्यासोबत झालेली नागपूर अधिवेशनातली भेट आठवते. आमचे मित्र आमच्या श्रीगुरुदेव चळवळीतून घडलेले दादा आपल्या चाणाक्ष दृष्टीने पारखलेले, साधा ग्रामीण भागातला कार्यकर्ता, प्रबोधनकार अमोल मिटकरी, आपणच ज्यांना विधान परिषद सदस्य आणि पक्षप्रवक्ता करून त्यांच्या गुणांचा सन्मान केला. आमदार अमोल मिटकरी यांनीच तुमची भेट आम्हाला घडवून आणली.

आपल्या उपमुख्यमंत्री बंगल्यात आपण दिलेली सकाळची आठची वेळ. आपण खुर्चीत विराजमान. आपला पहिला प्रश्न, आपण नाश्ता केला का? दादा, एवढी माणुसकी आपल्यात होती. गुरुकुंज आश्रमातून म्हणजे अमरावती जिल्हा येथून सकाळी निघालेली मंडळी उपाशी असतील. दादा, आपला धाक, आल्याबरोबर तिथल्या व्यवस्थापकांनी आमच्या नाश्त्याची व्यवस्था केली होती. गुरुदेव सेवा मंडळाचे ज्येष्ठ प्रचारक आचार्य हरिभाऊ वेरूळकर, प्रबोधनकार नामदेव गव्हाळे, स्वतः मी, श्रीगुरुदेव अध्यात्म गुरुकुलचे रविदादा मानव, नागपूर श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे अशोक यावले, सोबतीला राजकीय विश्लेषक अविनाश काकडे आम्हा सर्वांचा सर्वप्रथम आस्थेने आपण परिचय करून घेतला. नंतर आपण राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या श्रीगुरुदेव सेवा मंडळाची व्याप्ती समजून घेतली. मी म्हणालो, दादा, आपणास वेळ तर होणार नाही? आपण हसत म्हणाला, कधी तरी आपल्यासारखी गावखेड्यापर्यंत लोकजागरण करणारी मंडळी भेटतात. त्यांच्याकडन खूप काही शिकता येतं. मग मी आपल्या भेटीचा उद्देश सांगत म्हणालो, "अमरावती येथील संत गाडगेबाबा विद्यापीठात, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन निर्माण व्हावे यासाठी शासन अनुदानाची गरज आहे." दादा, आपण त्वरित संत गाडगे बाबा विद्यापीठाचे तत्कालीन प्रभारी कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांना फोन करून अध्यासनासंबधी सर्व माहिती घेतली. आम्ही दिलेल्या निवेदनावर आपण हिरवा शेरा मारला.

अजितदादा, या साऱ्या आठवणी आणि डोळ्यात अश्रूच्या धारा आहेत. दादा, ती भेट, तो आपला स्मित हास्य करणारा प्रसन्न चेहरा आणि भाषेचा वेगळा बाज माझ्या हृदयात कोरला आहे. तो सांभाळत मी माझ्यातला सेवाभाव जपणार आहे.

**ज्ञानेश्वर दुर्गादास रक्षक**/९८२३९६६२९२

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)





यावर्षी थंडी चांगली असल्याने गव्हाचे पिक जोमदार आले आहे त्याच बरोबर आंब्याला मोहोर चांगला आला आहे. बीड तालुक्यातील दहिवंडी (खडकीघाट) येथे घेतलेले छायाचित्र

# स्वा.सावरकर माध्यमिक विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ जानेवारी**

स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालय, बीड येथे भारतीय प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात राष्ट्रभक्तीचा जयघोष करत संविधानाच्या मूल्यांचे स्मरण करण्यात आले.



विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. विठ्ठल काळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तिरंग्याला सलामी दिल्यानंतर उपस्थित सर्वांनी सामुदायिकपणे राष्ट्रगीत व राज्यगीत सादर केले. तसेच, संविधानाचे वाचन करण्यात आले.

ध्वजारोहणानंतर महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संपूर्ण 'वंदे मातरम्'चे गायन आणि वंदे मातरम्'चा सविस्तर अर्थ विशद केला. सौ. सुलक्षणा खणके यांनी उपस्थितांना 'असाक्षरतेची शपथ' दिली.

याप्रसंगी मुख्य प्रशासकीय समन्वयक मा. प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य मा. श्री. उमेश जगताप, स्था.स. समिती अध्यक्ष मा. डॉ. पुरुषोत्तम कुलकर्णी व कार्यवाह मा. डॉ. अविनाश देशपांडे, शालेय समिती अध्यक्ष मा प्रमोदराव कुलकर्णी, जेष्ठ सभासद मा. गजाननराव जगताप, मुख्याध्यापक श्री विठ्ठल काळे, मुख्याध्यापिका सौ. बालिकाताई देशमुख, विद्यालयाचे उपमुख्याध्यापक श्री. संदीप देशमुख आणि विभाग प्रमुख श्री. बाळासाहेब साळवे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे स्वागत व परिचय प्रा. दीपक देशमुख यांनी केले. शेवटी प्रा. संतोष जोशी यांनी आभार प्रदर्शन केले.

# दुबईत गल्फ फूड प्रदर्शन; खा.बजरंग सोनवणे यांचा सहभाग

## भारतीय कृषी व अन्नप्रक्रिया उद्योगाला मिळणार नवी दिशा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ जानेवारी**

दुबई येथे सध्या सुरू असलेले जगप्रसिद्ध गल्फ फूड प्रदर्शन हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील अन्नप्रक्रिया व कृषी क्षेत्रातील सर्वात महत्त्वाचे व्यासपीठ मानले जाते. या भव्य प्रदर्शनात जगभरातील अन्नप्रक्रिया उद्योग, कृषी-उत्पादक कंपन्या, निर्यातदार, व्यापारी तसेच उद्योजक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. खासदार बजरंग सोनवणे हे सध्या या प्रदर्शनात उपस्थित असून त्यांनी या प्रदर्शनाचे भारतीय कृषी क्षेत्रासाठी असलेले महत्त्व अधोरेखित केले आहे.



गल्फ फूड प्रदर्शनामुळे भारतीय कृषी व अन्नप्रक्रिया उद्योगाला जागतिक बाजारपेठेशी थेट संपर्क साधण्याची मोठी संधी मिळत आहे. भारतीय उत्पादक, शेतकरी गट, प्रक्रिया उद्योग आणि निर्यातदारांसाठी हे प्रदर्शन एक प्रभावी मंच ठरत असून, यामुळे भारतीय उत्पादने आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचण्यास मदत होत आहे. परिणामी निर्यात वाढीस चालना मिळून शेतकरी व उद्योजकांच्या उत्पन्नात वाढ होण्याचा मार्ग मोकळा होत आहे.

याबाबत खासदार बजरंग सोनवणे यांनी म्हटले की, बीड जिल्ह्यासारख्या ग्रामीण भागात कृषीआधारित व अन्नप्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी अशा आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांचे मार्गदर्शन अत्यंत उपयुक्त ठरते. आधुनिक तंत्रज्ञान, जागतिक दर्जाचे पॅकेजिंग, विपणन पद्धती आणि निर्यातीच्या संधी यांची माहिती या प्रदर्शनातून मिळत असल्याने ग्रामीण भागातील युवक-उद्योजकांना नवे उद्योग सुरू करण्याची प्रेरणा मिळते.ग्रामीण भागात अन्नप्रक्रिया उद्योग सुरू झाल्यास स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होईल, शेतमालाला योग्य भाव मिळेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी प्राप्त होईल. तसेच युवकांना स्वावलंबी बनण्याची संधी मिळून स्थलांतरालाही आळा बसेल, असेही म्हटले आहे.या प्रदर्शनातून मिळणारा अनुभव, संपर्क आणि माहिती निश्चितच ग्रामीण उद्योगविकासासह देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी मोलाची ठरणार असल्याचा विश्वास खासदार बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केला आहे.

# दृष्टीरक्षणासाठी पुढाकार : बीडमध्ये आनंदऋषीजी नेत्रालयातर्फे विशेष नेत्रपटल (रेटिना) तपासणी शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ जानेवारी**

वाढत्या मधुमेहाच्या (डायबिटीज) पार्श्वभूमीवर डोळ्यांच्या आरोग्यावर होणारे गंभीर दुष्परिणाम लक्षात घेऊन जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी नेत्रालय, अहमदनगर यांच्या वतीने बीड येथे विशेष मधुमेही नेत्रपटल (रेटिना) तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर रविवार, दिनांक ८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत होणार आहे.

वेळीच तपासणी का आवश्यक?

मधुमेहामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण वाढल्यास डोळ्यातील पडद्याला (रेटिना) रक्तपुरवठा करणाऱ्या सूक्ष्म रक्तवाहिन्यांचे नुकसान होते. या आजाराला डायबेटिक रेटिनोपॅथी असे म्हणतात. सुरुवातीच्या टप्प्यात कोणतीही ठळक लक्षणे दिसून येत नसल्याने अनेकदा रुग्ण दुर्लक्ष करतात; मात्र वेळेवर उपचार न झाल्यास कायमस्वरूपी अंधत्व येण्याचा धोका असतो.



तज्ज्ञ डॉक्टर व अद्ययावत सुविधा

या शिबिरामध्ये अरविंद आय हॉस्पिटलचे अनुभवी नेत्रपटल तज्ज्ञ डॉ. केतन राठोड (MBBS, DNB, FVRS) रुग्णांची तपासणी व मार्गदर्शन करणार आहेत. आनंदऋषीजी नेत्रालयातील रेटिना विभाग अद्ययावत व आधुनिक उपकरणांनी सुसज्ज असून अचूक निदान व उपचार सुविधा उपलब्ध आहेत.

मोफत शस्त्रक्रिया:

तपासणीत शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या पात्र रुग्णांवर महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना (MJPJ-Y) अंतर्गत मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

इतर सुविधा:

रेटिना तपासणीसोबतच तज्ज्ञांचे समुपदेशन व मोफत रक्तशर्करा (ब्लड शुगर) तपासणी करण्यात येणार आहे.

शिबिराची माहिती:

दिनांक: रविवार, ८ फेब्रुवारी २०२६

वेळ: सकाळी ९.०० ते दुपारी २.००

स्थळ: आनंदऋषीजी डायग्नोस्टिक सेंटर, छत्रपती शाहू बँकेजवळ, जालना रोड, बीड

नोंदणी शुल्क: १००/-

आगाऊ नाव नोंदणी आवश्यक:

शिबिराचा लाभ घेण्यासाठी आगाऊ नाव नोंदणी करणे अनिवार्य आहे. जास्तीत जास्त मधुमेही रुग्णांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आनंदऋषीजी नेत्रालयातर्फे करण्यात आले आहे.

नाव नोंदणीसाठी संपर्क: ९८५००७७३६१ , ९०२१८६९६०२ , ८२६२००९०९१

# तहसील बीड व राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांच्या संयुक्त विद्यमाने आपदा मित्र-सखी प्रशिक्षण कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ जानेवारी**

तहसील कार्यालय, बीड व राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF), पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आपदा मित्र-सखी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.सदर प्रशिक्षण ११ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी या कालावधीत आयोजित करण्यात येणार असून, आपत्ती व्यवस्थापन, प्राथमिक बचाव कार्य, आपत्कालीन परिस्थितीत मदत व जनजागृती यासंबंधी महत्त्वाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

या प्रशिक्षणासाठी स्वयंच्छेने सहभागी होऊ इच्छिणारे खेळाडु, शिक्षक, कर्मचारी, समोदशक गृह रक्षक दलाचे सदस्य, सेवाभावी संस्था, तरुण मंडळे, बचाव गटांचे सदस्य यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात येत आहे.सदर प्रशिक्षण हे पूर्णतः स्वयंसेवी स्वरुपाचे असून, प्रशिक्षणार्थींना कोणताही मोबदला दिला जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.आपत्तीच्या वेळी समाजासाठी मदतीस तत्पर राहण्यासाठी हे प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याने पात्र व इच्छुक व्यक्तींनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसील प्रशासन, बीड यांच्यावतीने करण्यात येत आहे.

# बीड जिल्ह्याला बारामती प्रमाणे विकास करणारे कुशल नेतृत्व पडद्याआड-अनिल बोर्डे

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२९ जानेवारी**

बीड जिल्ह्याला बारामती प्रमाणे कुशल नेतृत्व, धाडसी, विकासाचे नेतृत्व, सचोटी, धैर्यशील, आश्वासन पाळणारे नेतृत्व, सर्व विभागाचे ज्ञान असणारे, महाराष्ट्रातील शहरी ग्रामीण भागाच्या समस्या बाबत विकास करणारे नेतृत्व दूरदृष्टी स्पष्टवक्तेपणा, सर्व समाजासाठी प्रयत्न करणारे, सर्व समाजाला न्याय देणारे, महाराष्ट्राच्या सर्व प्रश्नांचा अभ्यास असणारे नेतृत्व, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा यांच्या विमान अपघाताच्या दुर्दैवी मृत्यूमुळे महाराष्ट्राची व बीड जिल्ह्याची महाभयंकर व अपरिमित हानी झालेली आहे. ती कदापिही भरून येणे शक्य नाही. बीड जिल्हा पुन्हा एकदा काळोख्यात गेला आहे. यापूर्वी मराठवाडा व बीड जिल्ह्याचा विकास करणारे नेतृत्व माजी केंद्रीय मंत्री व महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री गोपीनाथरावजी मुंडे अचानक अपघातात गेल्यामुळे कुटुंबाचे व महाराष्ट्राचे व जिल्ह्याचे यापूर्वी ही महाभयंकर नुकसान झाले आहे. विकासाचे नेतृत्व अचानक गेल्यामुळे विकासाची संधी वारंवार जात आहे ही बाब जिल्ह्यासाठी वारंवार दुर्दैवी ठरत आहे. तरी यापुढे मा. देशाचे पंतप्रधान नरेंद्र जी मोदी व महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांनी बीड जिल्ह्याला विकासाच्या प्रवाहात समाविष्ट करून जिल्ह्याचा विकास करून वरील नेत्यांना बीड जिल्ह्याच्या तळमळीची , अंतिम इच्छा पूर्ण करावी ही खरी श्रद्धांजली ठरेल .

तसेच अजित दादाच्या कुटुंबाचे अतोनात नुकसान झाले आहे ते कदाचित भरून येणारे नाही. त्यांना यामधून सावरण्याचे बळ कुटुंबांना मिळो ही ईश्वरचरणी प्रार्थना. दादांना भावपूर्ण श्रद्धांजली त्यांच्या आत्म्यास शांती मिळो ही पुन्हा ईश्वरचरणी प्रार्थना!

अनिल बोर्डे

ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष तथा अध्यक्ष श्री जगदंबा ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था गेवराई. विविध संस्थेचे पदाधिकारी.

# शिवणी येथे बालविवाह व मतदार जनजागृती रॅली

## तुलसी फॅशन डिझाईन कॉलेजच्या 'रासेयो' तर्फे जनजागृती अभियान

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ जानेवारी**

देवगिरी प्रतिष्ठान संचलित, तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'शाश्वत विकास, पाणलोट व्यवस्थापन व पडीक जमीन विकासासाठी युवा' या संकल्पनेअंतर्गत सात दिवसीय विशेष शिबिराचे आयोजन शनिवार दि.१८ रोजी तालुक्यातील शिवणी येथे करण्यात आले आहे. या शिबिराचे औचित्य साधून शिवणी येथे 'बालविवाह प्रतिबंध' आणि 'मतदार जागृती' रॅली मोठ्या उत्साहात काढण्यात आली.

ही रॅली शिवणी ग्रामपंचायत कार्यालयापासून सुरू होऊन गावातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत ज्ञानेश्वर मंदिराच्या पटांगणात सांगता करण्यात आली. रॅलीदरम्यान मुलींना समजू नका भार, जीवनाचा आहे खरा आधार, बालविवाह म्हणजे बालअत्याचार, मुलींना वाचवा, देश वाचवा, प्रत्येकाने मतदान करा, लोकशाही बळकट करा अशा घोषवाक्यांच्या माध्यमातून बालविवाहाचे दुष्परिणाम तसेच मतदानाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात आले.यावेळी उपस्थितांनी बालविवाहमुक्त गाव घडवण्यासह जागरूक व जबाबदार मतदार घडवण्याचा संकल्प केला. रॅलीमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ.अश्विनी बेद्रे, उपप्राचार्या प्रा.सय्यद शहाणा, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.वृषाली लोखंडे, प्रा.श्वेता वंजारे, प्राध्यापकवृंद तसेच रासेयो स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल औंढ्यात बाजारपेठ बंद

## हिंगोलीत सर्वपक्षीय नेत्यांनी वाहीली अजित पवारांना श्रध्दांजली







**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ जानेवारी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी सकाळी विमान दुर्घटनेत अपघाती निधन झाले. त्यामुळे २९ जानेवारी गुरुवार रोजी औंढा नागनाथ येथे व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने बाजारपेठ बंद ठेवली होती. यामुळे शहरात केवळ शांतता आणि दुःखाचे सावट पसरले असून व्यवहार पूर्णपणे ठप्प झाले होते. तसेच हिंगोली येथील गांधी चौक, संविधान कॉर्नर येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी तसेच नागरिकांनी श्रध्दांजली अर्पण केली.

सकाळी अकरा वाजता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सर्वपक्षीय भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी कार्यकर्त्यांनी एकच वादा, अजित दादा अजितदादा अमर रहे च्या घोषणा दिल्या. तर काही कार्यकर्त्यांना श्रद्धांजली वाहतेवेळी आपले अश्रू आवरता आले नाहीत.

यावेळी शिवसेना (शिंदे ) साहेबराव देशमुख, भाजपाचे शरद पाटील, काँग्रेसचे नगरसेवक अज्जू इनामदार, राष्ट्रवादी ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष विक्की देशमुख, राष्ट्रवादीचे अजहर इनामदार, राष्ट्रवादी शहराध्यक्ष निलेश मुळे, शिवसेनेचे अलीम खतिब, राष्ट्रवादीचे संतोष गोबाडे, नागेश घोंगडे, संदीप गोबाडे, शेख मुजीब, नवनाथ देशमुख आदी उपस्थित होते.

# अवैध वाळू वाहतुक करणारे दोन हायवा पोलिसांनी पकडले

## ३५ लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ जानेवारी**

आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यांतर्गत एक आणि औंढा नागनाथ पोलिस ठाण्यांतर्गत एका अशा दोन हायवा टिप्परमध्ये अवैध वाळूची वाहतुक करीत असतांना अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांच्या पथकाने पकडले असून त्यांच्याकडून ३५ लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच आरोपींविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांचे पथक पेट्रोलिंग करीत असतांना नांदेड जिल्ह्यातून एक हायवा टिप्पर वाळूची अवैध वाहतुक करीत असल्याची माहीती पथकाला मिळाली. पथकाने सापळा रचून आखाडा बाळापूर परिसरातील टव्हा या गावाजवळ एका हायवाला थांबवून तपासणी केली असता त्याने अमरावती जिल्ह्यात जात असल्याची पावती दाखवली परंतु दिलेला मार्ग व वेळ याबाबत संशय आल्यामुळे पथकाने अधिक चौकशी केली असता सदर वाळू ही चढ्या दराने विक्री करण्याचे उद्देशाने नियमानुसार दिलेला मार्ग सोडून चालक परमेश्वर माधव केंद्रे रा उमरगा याच्याविरूध्द आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी हायवा टिप्परसह वाळू असा २० लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

औंढा नागनाथ पोलिस ठाण्यांतर्गत अवैध वाळूची वाहतुक करणारे टिप्पर औंढा पोलिसांनी पकडले. या प्रकरणी जमीर शेख पाशा शेख रा गोळेगाव ता औंढा नागनाथ, इरशाद पटेल रा औंढा नागनाथ यांचेविरूध्द औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी एक टिप्परसह वाळू असा एकूण १५ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरची कारवाई पोलिस अधीक्षक डॉ निलभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि गणेश राहीरे, अंमलदार विलास राठोड, संदीप पवार, सतीश नरवाडे, सुमीत ठोके, विनोद कुटे यांनी केली आहे.

# म्हशी व रेडे घेवून जाणारा आयशर पोलिसांनी पकडला

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ जानेवारी**



वसमत ते औंढा नागनाथ रस्त्यावरील भेंडेगाव शिवारातील रेल्वे गेटजवळ एका आयशर वाहनांमध्ये निर्दयीपणे दाटीवाटीने १२ म्हशी व ८ रेडे नेण्यात येत असतांना पोलिसांनी वाहनासह कुरूंदा पोलिसांनी पकडला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार वसमत ते औंढा नागनाथ रस्त्यावरील भेंडेगाव शिवारातील रेल्वे गेटजवळ एका आयशर वाहनामध्ये म्हशी व रेडे घेवून जात असल्याची माहीती पोलिसांना मिळताच अंमलदार बी एल वडकिल्ले व डी जी ठोंबरे, आर एच जाधव तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकातील गोरे, सावळे यांनी घटनास्थळी तत्काळ भेट देवून सदर आयशर क्रमांक एम एच ०४ एल क्यू ४५१० यास थांबवून तपासणी केली असता त्यामध्ये म्हशीचे १२ वघार व ८ रेडे असे एकूण २० जनावरे दाटीवाटीने निर्दयीपणे कोंडल्याचे आढळून आले. पथकाने वाहनासह जनावरांना ताब्यात घेतले असून मल्लीक मुरादखान रा खाडीपार रसुलाबाद ता भिवंडी, आमेर पाशा कुरेशी रा साठे नगर जिंतूर यांचे विरूध्द कुरूंदा पोलिस ठाण्यात प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सपोनि रामदास निरदोड यांच्या मार्गदर्शनाखाली बी एल वडकिल्ले हे करीत आहेत.



**हिंगोली– मुंबई येथील वर्षा निवासस्थानी मंगळवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माजी आ. डॉ प्रज्ञा सातव यांनी सदीच्छा भेट घेतली. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पुष्कराज सातव यांची उपस्थिती होती. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### राहोली बु येथे मोफत आरोग्य शिबीर



हिंगोली– गरीब नवाज रिलीफ फाउंडेशन तर्फे राहोली बुद्रुक जिल्हा हिंगोली २६ जानेवारी गणतंत्र दिवस निमित्त मोफत महाआरोग्य व व्यसन मुक्ती शिबिर ठेवण्यात आले होते. यावेळी रूग्णाची मोफत तपासणी करण्यात आली. हाड्यातील कॅल्शियम आणि ताकदीचे घनता तपासणे, शुगर, कोलेस्ट्रॉल किडनीची तपासणी, रक्तगट बालरोग तपासणी, दातांची तपासणी, डोळ्याची तपासणी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे आयोजक शेख आवेज व शेख मनान, डॉ बिलाल, ग्रामपंचायत सदस्य सतीश लोणकर, ईश्वर जावळे, शेख आबरार यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष आ. संतोष बांगर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच रवी डोरले, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख परमेश्वर मांडगे, माजी उपसरपंच शेख मोहम्मद, प्राचार्य विक्रम जावळे, उपसरपंच रमेश जावळे, ज्ञानेश्वर सोडगीर. शेख हमीद, रामू लोणकर, सुभाष जावळे, हशमत, शेख कयूम, पाशा, आयाज, बाबूलाल, शेख आवेज या सर्वांचे उपस्थिती होती यावेळी तज्ञ डॉक्टर शुभम रोडगे, डॉ फैसल खान, डॉ. अझर देशमुख, डॉ. बिलाल शेख, डॉ असरार शेख कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामेश्वर लोणकर यांनी केले.

### पवार पब्लीक स्कूलमध्ये सांस्कतिक कार्यक्रम



हिंगोली– शहरातील पवार पब्लिक स्कूल येथे प्रजासत्ताक दिनाच्या संधेला सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी मुलांनी देशभक्तीपर गीते, फॅन्सी ड्रेस तसेच ड्रामा करून एका पेक्षा एक बहारदार गाण्यावर विद्यार्थ्यांनी प्रेक्षकांची मने जिंकत मंत्रमुग्ध केले. यावेळी कार्यक्रमाच्या उद्घाटनाप्रसंगी शिवाजीराव पवार, मंदाताई पवार उपस्थित होते. यावेळी शाळेचे संचालक प्रणव पवार, कोमल अग्रवाल, सचिन धामणे, सॉली केसी, जॉबीन जॉर्ज, योगेश थोरात, अपर्णा जामकर, दीपाली राऊत, अश्विनी बोराळकर, पंकज इंगोले, फिजा सय्यद, दिपाली मुदिराज, रुपाली ठाकरे, छाया धनवे, सचिन इंगोले, गजानन वानरे, संतोष मस्के, संतोष पाईकराव, वैभव काळे, विकास महानोर आदींची उपस्थिती होती.

{XA}

# मुलींच्या वसतीगृहात नेताजी सुभाषचंद्र बोस, बाळासाहेब ठाकरे जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ जानेवारी**

येथील अंतुले नगर भागातील इतर मागास बहुजन कल्याण मुलींच्या वसतीगृहात नेताजी सुभाषचंद्र बोस आणि शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी नेताजी सुभाषचंद्र बोस आणि हिंदू ऱ्हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थीनींना नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी दिलेले बलिदान तसेच बाळासाहेब ठाकरे यांनी समाजासाठी, मराठी अस्मितेसाठी केलेले कार्याबद्दल भाषणे दिली. यावेळी वसतीगृह गृहपाल श्रध्दा तडकसे, पल्लवी शिंदे, आश्विनी डोंगरे, जयश्री जाधव, शिवकन्या खोकले यांच्यासह वसतीगृहातील विद्यार्थींनी यांची उपस्थिती होती.

# डॉ आंबेडकरांचा नामोल्लेख टाळणाऱ्या गिरीष महाजनांवर कार्यवाही करा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ जानेवारी**



प्रजासत्ताक दिनाच्या ध्वजारोहनाप्रसंगी राज्याचे मंत्री गिरीष महाजन यांनी भाषणामध्ये संविधान निर्माते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा नामोल्लेख टाळला. त्यामुळे आंबेडकरी प्रेमींच्या भावना दुखावल्या असून याप्रकरणी त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी बहुजन अधिकारी, कर्मचारी महासंघाच्यावतीने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

दि २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी राज्याचे मंत्री गिरीष महाजन यांनी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा भाषणवेळी नामोल्लेख टाळला. त्यामुळे तेथे उपस्थित वनविभागाच्या कर्मचारी माधवी जाधव यांनी त्यांना जाब विचारला. त्यांच्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये, गिरीष महाजन यांना ध्वजारोहन करण्याचा अधिकार देऊ नये, डॉ बाबासाहेब यांचा अपमान केल्याप्रकरणी गिरीष महाजनांवर कार्यवाही करण्यात यावी, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा ध्वजारोहनावेळी ठेवण्याचा जी आर काढावा, गिरीष महाजन यांच्या कृतीचा निषेध यावेळी करण्यात आला. निवेदनावर बाबासाहेब इंगोले, अॅड के जे आरगडे, विक्रम जावळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शाहू नगर, सम्राट नगर येथे नागरी सुविधा द्या, रहीवाशांचे नगर पालिका प्रशासनाला निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ जानेवारी**



शहरातील शाहूनगर व सम्राट नगर परिसरातील रस्ते, नाल्या, नळपाणी योजना व विद्युत लाईन, घरकुल हप्ते यासारख्या मूलभूत नागरी सुविधांची अवस्था अत्यंत दयनीय असून, सन २०२० पासून वारंवार निवेदने व आंदोलने करूनही नगरपरिषद प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही, असा गंभीर आरोप रिपब्लिकन सेनेच्या वतीने करण्यात आला आहे.

रिपब्लिकन सेनेचे महाराष्ट्र युवक प्रदेशाध्यक्ष किरणभाऊ घोंगडे यांनी या संदर्भात हिंगोली नगरपरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन सादर करून प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. नगरपालिका निवडणूक प्रचाराच्या काळात शाहूनगर व सम्राट नगर येथील नागरिकांना विजेचे लोबकांळलेले तार, वाकडे झालेले विद्युत खांब, रस्ते, नाल्या व नळपाणी योजनेची कामे तात्काळ करण्यात येतील, अशी स्पष्ट आश्वासने देण्यात आली होती. मात्र आज शासन, प्रशासन व नगरपालिका सत्तेत असूनही ही आश्वासने हवेतच विरली असल्याचे चित्र दिसून येत आहे.

सद्यस्थितीत या परिसरात नियोजनबद्ध नाल्यांची व्यवस्था नाही, अंतर्गत रस्ते अत्यंत खराब अवस्थेत किंवा अस्तित्वातच नाहीत, नगरपालिकेची नळपाणी पाईपलाईन उपलब्ध नाही तसेच विद्युत तारा जीवघेण्या अवस्थेत लटकलेल्या आहेत. यामुळे लहान मुले, महिला व नागरिकांच्या जीवितास मोठा धोका निर्माण झाला आहे.

या भागात मोठ्या प्रमाणात लहान मुले, महिला व ज्येष्ठ नागरिक वास्तव्यास असून, नागरिक नियमितपणे घरपट्टी, नळपट्टी व इतर सर्व कर भरत असतानाही मूलभूत सुविधा न मिळणे हा सरळसरळ अन्याय असल्याचे किरण घोंगडे यांनी स्पष्ट केले. प्रशासनाने तात्काळ उपाययोजना न केल्यास रिपब्लिकन सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

यावेळी युवा प्रदेशाध्यक्ष किरण घोंगडे, लिगल सेलचे महाराष्ट्र नेते अॅड रावन धाबे, अॅड अभिजित खंदारे, भिमराव सकपाळ, डॉ चंद्रमुणी पाईकराव, बाबासाहेब घनसावंत, गोरख खिल्लारे, प्रा.भिमानंद काळे, आकाश दातार, यशवंतराव साळवे, देवा कांबळे, पंडित सुर्यतळ, भारत गडधने लखन सरतापे, राजु सरतापे, दिलिप लोणकर, करण फुंदसे, आकाश कांबळे, संजय वाकळे, भारत वाकळे, महेंद्र घोंगडे, पुरभाजी घोग़डे, प्रताप घोंगडे, प्रा.बाळासाहेब पाईकराव, कामाजी खिल्लारे यांच्यासह महिला जिल्हाध्यक्ष अनिताबाई भगत, मुनिर पठाण, गिताबाई वाघमारे, भीमराव सपकाळ, पुरभाजी घोंगडे, माधव घोंगडे, मधुकर घोंगडे, आशाबाई सोनवणे, सिंधू राऊत, प्रकाश पुंडगे, छायाबाई गायकवाड, अॅड. दीपक धांडे, शरीफा शेख वैशाली वाटोळे, पंचशीला हटकर, कृष्णाबाई पाईकराव वनिता पठाडे आदींची उपस्थिती होती.

# रामलीला मैदानाची सफाई

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ जानेवारी**

शहरातील रामलीला मैदानावर अस्वच्छता तसेच कचऱ्याचे ढीग साचले होते. यासंदर्भात तरूण भारतने वृत्त प्रकाशित केले होते. या वृत्ताची दखल नगराध्यक्षा रेखा श्रीराम बांगर यांनी घेत नगर पालिका प्रशासनाला रामलीला मैदानाची साफसफाई करण्याचे आदेश दिले.

येथील रामलीला मैदानावर प्रशासनाने लाखो रूपये खर्च करून नागरिकांना मॉर्निंग वॉक, इव्हीनींग वॉकसाठी ट्रॅक तयार केले होते परंतु काही समाजकंटकाकडून याठिकाणी दारूच्या बाटल्या तसेच केरकचरा टाकून अस्वच्छता निर्माण करण्यात आली होती. त्यामुळे खेळाडूंना अनेक अडचणी तसेच नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत होता.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महापौर निवडीसाठी १० फेब्रुवारी रोजी मनपाची विशेष सभा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २९ जानेवारी-**

नांदेड महापालिकेच्या पंधराव्या महापौरपदाची निवड दि. १० फेब्रुवारी होणार असुन महापालिका स्थापनेपासून पहिल्यांदाच भाजपाचा महापौर होणार आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्तांनी महापौर निवडीचा कार्यक्रम घोषित केला आहे. १० फेब्रुवारी रोजी महापालिकेची विशेष सभा महापौर निवडीसाठी घेतली जाणार आहे. या निवडीप्रसंगी नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले हे पिठासीन अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत. नांदेड महापालिकेत भारतीय जनता पक्षाने ४५ नगरसेवक निवडून आणत एकहाती सत्ता मिळवली आहे.

नांदेड महापालिकेचे पहिले महापौर म्हणून शिवसेनेचे सुधाकर पांढरे हे २१ ऑक्टोबर १९९७ रोजी विराजमान झाले होते. हा एक अपवाद वगळता महापालिकेच्या सभागृहात पुढे काँग्रेसचेच महापौर निवडून आले. गेल्या दहा वर्षाचा नांदेड महापालिकेत महापौरपदी महिला राज राहिले आहे. यामध्ये २७ एप्रिल २०१५ रोजी शैलजा किशोर स्वामी या निवडून आल्या होत्या. त्यानंतर शीला किशोर भवरे, दीक्षा कपिल धबाले, मोहिनी विजय येवनकर आणि जयश्री निलेश पावडे या सलग पाच महिला महापौरांनी नांदेडचा कारभार सांभाळला आता पुन्हा एकदा नांदेडचे महापौर



पद हे महिलांसाठी राखीव आहे त्यामुळे आता पंधराव्या महापौर म्हणूनही महिलेची महिलेची निवड होणार आहे.

महापौर पदाचा कार्यकाळ हा अडीच वर्षाचा असला तरीही मागच्या दहा वर्षातील महापालिकेतील सव्वा सव्वा वर्षाचा पॅटर्न पाहता पुन्हा तोच पॅटर्न अंमलात आणून कार्यकर्त्यांना संधी दिली जाईल का हे पाहणे हे आगामी काळात औत्सुक्याचे ठरणार आहे. त्यातही आता महापालिकेत भाजपा युगाचा प्रारंभ होणार आहे. ८१ नगरसेवकांच्या महापालिकेत विरोधी पक्षात ३१ नगरसेवक राहणार आहेत. त्यामुळे महापालिकेत विरोधकांची ही संख्या मोठी आहे. हीच बाब पाहता महापालिकेचा कारभार सांभाळण्यासाठी सक्षम नेतृत्व असावे, अशी भूमिका माजी मुख्यमंत्री, खासदार अशोकराव चव्हाण यांनी घेतली आहे. त्यामुळे आता महापौर निवडीत कुणाला संधी मिळेल, याकडे लक्ष लागले आहे.

नांदेड महापालिकेच्या सभागृह कार्यकाळ समाप्तीनंतर जवळपास तीन वर्षानंतर सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या. ८१ नगरसेवक पदांसाठी या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने सर्वाधिक ४५ जागा प्राप्त केल्या आहेत. भाजपनंतर एमआयएम नांदेड महापालिकेत दुसऱ्या स्थानी राहिला आहे. एमआयएमने १४ जागा जिंकल्या आहेत. काँग्रेस पक्षाला १० जागा, वंचित बहुजन आघाडीला महापालिकेत यश मिळाले असून पाच उमेदवार मोठ्या मत फरकाने निवडून आले आहेत. शिवसेना शिंदे गट चार, राष्ट्रवादी अजित पवार गट दोन आणि एक अपक्ष उमेदवारही या निवडणुकीत निवडून आला आहे.

**यांची नावे चर्चत**

माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण हेच महापौर पदाचे नाव अंतिम करणार आहेत. यावेळीही सर्वसाधारण प्रवर्गातील महिलेसाठी महापौर पद आरक्षित आहे. त्यामध्ये आता भारतीय जनता पक्षाकडून ज्योती किशन कल्याणकर, सुदर्शना महेश उर्फ बाळू खोमणे, कविता संतोष मुळे, शांभवी प्रवीण साले, वैशाली मिलिंद देशमुख, कविता नागनाथ गड्डम, रुची अल्केश भारतीय यांच्यासह मनप्रीतकौर कुंजीवाले यांचेही नाव चर्चेत आहे.

# केबल चोरणाऱ्या अज्ञात टोळीवर गुन्हा दाखल

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. २९ जानेवारी-**

हिमायतनगर तालुक्यातील सवना ज . शिवारात २७ ते २८ जाने . च्या सकाळी आखाड्याचे कुलूप तुटलेले दिसले . आखाडयात टिन पत्राच्या शेडमधील १०० फुट वायर व मोटार पासून सोलारच्या कंट्रोल बॉक्स ला फोडून ३००० हजाराचे नुरुकात करून वायर तोडून घेवून विहिरीस मोटारीस लावलेला अंदाजे १०० फुट केबल अंदाजे किमन ८००० रुपये किमतीचा कापून मोटार पाण्यात टाकून दिला . तसेच सोलारचा कंट्रोल बॉक्सू फोडल्याने १८००० हजाराचे नुसकान केले आहे . तसेच शांताबाई यांच्या नावे असलेल्या शेतातील मोटारीचा वायर किमत १०,०००, रु चोरीस गेला . चोरट्यांनी धुमाकूळ घालत माझ्या सह सवना व हिमायतनगर हद्दितील १५ शेतकऱ्यांच्या शेतातील बोअर, सिंचन विहीरीमधे असलेल्या मोटारीचे केबल , सोलार कंट्रोल बॉक्स ची सोलार चे वायर कापून चोरट्यांनी ,४७००० किमतीचा मुद्देमाल चोरट्याच्या अज्ञात टोळीने नेल्याची घटना बुधवारी सकाळी उघडकीस आली . सवना ज . गट क्रमांक ६६ चे युवा शेतकरी ओमकार पोशट्टी अनगुलवार यांच्या तक्रारीवरून हिमायतनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे . पोनि अमोल भगत च्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार गेडाम तपास करीत आहेत. . या घटनेमुळे शेतकऱ्यांत खळबळ उडाली आहे.एकाच रात्री १६ शेतकऱ्यांच्या शेतातील केबल चोरीला गेल्यामुळे शेतकऱ्याच्या विहिर बोअर वरील मोटारीचे पाणी देण्याचे काम ठप्प झाले आहे. हिमायतनगर तालुक्यातील सवना ज . शिवारात मंगळवारी मध्यरात्री शेतकऱ्यांच्या शेतातील बोअर व सिंचन विहीरीमध्ये असलेल्या मोटारीचे केबल व सोलार मोटारी चे केबल कापून श्रीराम नाराय लक्षटवार यांच्या शेतात तुरीच्या पेंढ्यांनी वायर जाळून तांबे काढून घेवून पसार झाले असल्याची घटना बुधवारी सकाळी उघडकीस आली आहे. नंतर संबंधीत सर्व शेतकरी पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी आले १६ शेतकऱ्याच्या वतीने ओमकार पोशट्टी अनगुलवार यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल झाला आहे. कारला शिवरात जवळपास विस ते पंचवीस शेतकऱ्यांच्या शेतातील मोटारीचे केबल चोरीला गेल्याची घटना एक महिन्या पूर्वी घडली आहे. सवना व कारला शिवारातील केबल चोरणारे चोरटे एकच असल्याची शंका आहे .महिन्यांपासून चोरट्यांच्या टोळीचा धुमाकुळ चालू आहे. . त्यामुळे शेतकऱ्यात भितीचे वातावरण पसरले आहे . . सध्या रब्बी हंगाम सुरू असल्यामुळे शेतकरी गहू हरभरा ज्वारी पिकांना पाणी देत आहेत . मंगळवारी एकाच रात्री केबल १६ शेतकऱ्याचे केबल तोडून नेले असल्याने मोटारी बंद पडल्या आहेत .या केबल मध्ये तांबा असल्याने तांबा विकून चोरटे डल्ला मारत आहेत. सदरील चोरट्यांच्या टोळीने हैदोस घातला असुन पोलिस प्रशासनाने गांभीर्याने चोरट्यांचा शोध घेतला पाहिजे तांबा कुठे विकल्या जातो याचा शोध घेणे गरजेचे आहे .ऐन पाणी देण्याची वेळ असताना शेतातील मोटार पंप बंद पडले असुन या घटनेमुळे शेतकऱ्यांना धक्का बसला आहे.

## भोकर येथे अजितदादांना श्रद्धांजली

**भोकर -** येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे विमान अपघातात बारामती येथे दि. २८जानेवारी रोजी दुखद निधन झाल्याने सर्व पक्षाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली आहे.गुरुवार



दिनांक २९जाने रोजी येथील डॉ. आंबेडकर चौकात राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी शोकसभा घेतली यावेळी ओबीसी नेते नागोराव शेडगे म्हणाले राष्ट्रवादीचे धडाडीचे खंबीर नेतृत्व हरवले आहे दादाच्या जाण्याने राजकीय पोकळी निर्माण झाली. जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते पत्रकार एल. ए. हिरे म्हणाले अजित दादा हे परखड बोलणारे ग्रामीण भागावर विकासासाठी भर देणारे खंबीर नेतृत्व होतं फुले शाहू आंबेडकर पुरोगामी विचाराचे दादासारखं नेतृत्व अचानक नाहीसे झाल्याने महाराष्ट्रात राजकीय पोकळी निर्माण झाल्याची श्रद्धांजली यावेळी बहुजन नेते नागनाथ घिसेवाड राष्ट्रवादी पक्षाचे विधानसभा अध्यक्ष शिवाजी पाटील लगळुदकर, ताहेर बेग युवा तालुका अध्यक्ष परशुराम पाटील डौरकर,महिला तालुका अध्यक्ष यशोदाबाई शेळके, चंद्रकला गायकवाड,शकुंतला देशमुख, सुरेश कावळे, जवावोद्दीन बरबडेकर, रजाक सेठ पत्रकार अनिल डोईफोडे, अजय टाक पत्रकार गंगाधर पडोळे शेखर कुंटे, शिवसेनेचे सुभाष नाईक, भाजपचे परमेश्वर भालेराव, आप्पाराव राठोड, जगदेराव देशमुख, कासिफ पटेल रवीगेंटेवार इत्यादीसह असंख्य कार्यकर्ते नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते अनेकांच्या राष्ट्रवादी पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या डोळ्यात अश्रूत तरळत होते अत्यंत भावनिक श्रद्धांजलीचा कार्यक्रम घेण्यात आला.

# धावत्या रेल्वेतून पडलेल्या जखमी तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २९ जानेवारी-**

किनवट तालुक्यातील बोधडी येथील रहिवासी मारोती रामा बोईनवाड (वय ३३) यांचा धावत्या रेल्वेतून पडून झालेल्या अपघातानंतर उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. दि. २५ जानेवारी २०२६ रोजी रात्री १०.१० वाजण्याच्या सुमारास मारोती बोईनवाड हे किनवट ते तिरुपती कृष्णा एक्सप्रेस या रेल गाडीने प्रवास करीत होते. याच



दरम्यान बोधडी रेल्वे स्टेशन परिसरात ते धावत्या गाडीतून अचानक खाली पडल्याने गंभीर जखमी झाले.

अपघातानंतर त्यांना तात्काळ उपचारासाठी नांदेड येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र त्यांची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना मुंबई येथील सर जे. जे. रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे वैद्यकीय उपचार सुरू असताना आज दि. २९ जानेवारी २०२६ रोजी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे बोईनवाड कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी नोंद घेतली असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू असल्याचे समजते.

# ऊस पुरवठा प्रोत्साहन योजनेचे जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी लाभ घ्यावा : अध्यक्ष सुभाषराव देशमुख

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २९ जानेवारी-**


शिऊर साखर कारखाना लि.वाकोडी व श्री सुभाष शुगर प्रा. लि.हडसनी या दोन्ही कारखान्या क्षेत्रातील ऊस उत्पादकांच्या विश्वासाने व चांगल्या उत्तम सहकार्याने गाळप हंगाम २०२५-२६ यशस्वीपणे चालू असून दोन्ही कारखान्यात मिळून प्रतिदिन १०,००० मे. टन गळप चालू असून गेटकेन विभागातील ऊस उत्पादकांनी न घाबरता इतर कारखान्यास गाळपास आपला ऊस देऊ नये व लागवड हंगाम २०२५-२६ पुरवठा प्रोत्साहन योजनेचे ऊस उत्पादक शेतकरी बांधवांनी जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आव्हान अध्यक्ष सुभाषराव देशमुख व कार्यकारी संचालक सुशीलकुमार देशमुख यांनी केले आहे.



ह द गा व - हिमायतनगर,उमरखेड , कळमनुरीसह कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकरी बांधवांनी गेटकेन विभागातील शेतकऱ्यांनी न घाबरता इतर कारखान्यास ऊस देऊ नये कारण यावर्षी महाराष्ट्रात सर्व भागात भरपूर पर्जन्य मान्य झाले असून धरणाच्या पाणी साठ्यात वाढ झालेली आहे इतर प्रत्येक कारखान्याच्या कार्यक्षेत्रात देखील भरपूर प्रमाणात ऊस लागवड झाली असून ते पुढील वर्षी आपला ऊस गाळपास घेऊन जाणार नाहीत तरी आपला हक्काचा शिऊर साखर कारखाना व श्री सुभाष शुगर प्रा. लि. हडसणी या कारखान्यास ऊस देऊन सहकार्य करण्याचे आव्हान यावेळेस करण्यात आले. पंधरवडा योजना पुढील प्रमाणे असून १ ते १५ फेब्रुवारी २०२६ जाहीर केलेला अंतिम दर २७५१ रु. तर प्रोत्साहन पर रक्कम २५ रु. असून एकूण २७७६ रु. दर राहणार आहेत.१६फेब्रुवारी ते १५ मार्च २०२६ जाहीर केलेला अंतिम दर २७५१ रु.तर प्रोत्साहनपर रक्कम १०० रु. एकूण २८५१ रु.दर राहणार आहेत.१६ मार्च ते पुढे २०२६ जाहीर केलेला अंतिम दर २७५१ रु. तर प्रोत्साहनपर रक्कम २०० रु.एकूण २९५१ रु. अंतिम दर राहणार आहे.

**शेतकऱ्यांच्या हितासाठी सदैव प्रयत्नशील : सुशीलकुमार देशमुख**

आपल्या हदगाव - हिमायतनगर सह उमरखेड, कळमनुरी कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकरी बांधवांची



कामधेनु म्हणून नावलौकिक मिळवलेले श्री सुभाष शुगर प्रा.लि. हडसनी व शिऊर साखर कारखाना लि. वाकोडी या कारखान्यास आपला ऊस मोठ्या प्रमाणात गाळपास देऊन आपली प्रगती व आर्थिक फायदा करून घ्यावे आम्ही नेहमीच ऊस उत्पादक शेतकरी हितासाठी व समृद्धीसाठी सदैव प्रयत्नशील राहणार असल्याचे मत कार्यकारी संचालक सुशील कुमार देशमुख यांनी व्यक्त केले.

## मुदखेड येथील केंद्रीय प्रशिक्षण महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा

**मुदखेड -** केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या केंद्रीय प्रशिक्षण महाविद्यालय, मुदखेड येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन एका सन्माननीय आणि आनंदी वातावरणात पार पडला. सकाळच्या थंड सूर्याच्या लखलखत्या प्रकाशात, सकाळी ८ वाजता संस्थेचे कमांडंट-कम-चीफ ट्रेनिंग ऑफिसर व्ही.पी. त्रिपाठी यांच्या हस्ते ध्वजारोहण समारंभाने समारंभाची सुरुवात झाली आणि अभिमानाने तिरंगा फडकवण्यात आला. या प्रसंगी, समारंभात उपस्थित असलेले सर्व अधिकारी, कर्मचारी आणि प्रशिक्षणार्थींनी एकत्रितपणे राष्ट्रगीत गायले. या पवित्र प्रसंगी, संस्थेचे कमांडंट-कम-चीफ ट्रेनिंग ऑफिसर व्ही.पी. त्रिपाठी यांनी आपल्या भाषणात उपस्थितांना संविधान आणि लोकशाही मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, संविधान केवळ आपले अधिकारच नोंदवत नाही तर आपल्याला आपल्या कर्तव्यांचे आणि जबाबदाऱ्यांकडे मार्गदर्शन करते. लोकशाही ही केवळ शासन व्यवस्था नाही तर प्रत्येक नागरिकाचा सक्रिय सहभाग देखील आहे. समारंभानंतर, कमांडंट-कम-चीफ ट्रेनिंग ऑफिसर यांनी उपस्थित असलेल्या सर्व अधिकारी, सैनिक आणि माध्यम कर्मचाऱ्यांना मिठाई वाटली. या कार्यक्रमातून हे स्पष्ट झाले की राष्ट्रीय सणांचा उद्देश केवळ औपचारिकता नसून देशभक्ती, एकता आणि संविधानाची जाणीव वाढवणे आहे. याव्यतिरिक्त, प्रजासत्ताक दिनानिमित्त संस्थेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यात राजपत्रित अधिकाऱ्यांना अधीनस्थ अधिकाऱ्यांसाठी ॲट होम पार्टीचे आमंत्रण, कर्मचाऱ्यांमध्ये व्हॉलीबॉल स्पर्धा, मुलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम, संयुक्त जेवण आणि सर्व इमारतींमध्ये भव्य सजावट यांचा समावेश होता. याप्रसंगी उपस्थित अध्यक्षांमध्ये वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. नासपुरे संदीप, उपकमांडंट अरुण कुमार, उपकमांडंट मोहम्मद शाहनेवाज, उपकमांडंट करनजित सिंग, सहाय्यक कमांडंट हरिशंकर प्रसाद, सहाय्यक कमांडंट वासुदेव, इतर अधीनस्थ अधिकारी आणि कर्मचारी आणि प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

## खरब खंडगांवात पाणपोई चे लोकार्पण

**आदमपूर-** मुखेड तालुक्यातील ग्राम खरब खंडगांव येथे श्री क्षेत्र ओंकारेश्वर जागृत देवस्थान यात्रा महोत्सवानिमित्त अखंड शिवनाम सप्ताह




व ग्रंथराज परमरहस्य पारायण सोहळा आणि भुमिपुत्रांचा गौरव सोहळा आयोजित करून पाणपोईचे मंगळवार दि.२७ रोजी सामुहिक लोकार्पण करण्यात आले. या अध्यात्मिक सत्संग सोहळ्यानिमित्त येणाऱ्या सद्भक्त भाविकांना पिण्याच्या पाण्याची सुविधा व्हावी यासाठी येथील उपसरपंच प्रतिनिधी परमेश्वर तुळशीराम तरटे व मित्र परिवाराच्या वतीने ही पाणपोई सुरू करण्यात आली.यावेळी परमेश्वर तरटे, सौ.सुमित्रा तरटे,मित्र परिवार, प्रतिष्ठित गावकरी यांची उपस्थिती होती.

## इस्लापूर येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना बाजारपेठ बंद ठेवून श्रद्धांजली

**इस्लापूर -** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे सकाळी लॅडिंग दरम्यान झालेल्या भीषण अपघातात निधन झाल्याची वार्ता समजताच इस्लापूर परिसरात अक्षरश शोककळा पसरली. इस्लापूर येथील व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने दि. २९ रोजी आपले सर्व बाजारपेठ बंद ठेवुन आपलया भावना व्यक्त श्रद्धांजली वाहिली. इस्लापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्प हार अर्पण करुन सर्वपक्षाच्या वतीने उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहिली यावेळी इस्लापूर परीसरातील व्यापारी वर्ग व सर्व पक्षाचे आजी माजी पदाधिकारी विविध संघटनेची पदाधिकारी व गावकरी उपस्थित होते.

## नायगांव येथील हेडगेवार चौकात उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. २९ जानेवारी-**



महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाने राज्याने विकासाभिमुख,कर्तव्यनिष्ठ आणि जनतेसाठी झटणारे नेतृत्व गमावले आहे. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ नांदेड जिल्ह्यातील नायगांव तालुक्यातील हेडगेवार चौक येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने गुरुवारी सकाळी श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नांदेड जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर म्हणाले, अजितदादा हे केवळ नेते नव्हते, तर लाखो जनसामान्यांचे व कार्य कर्त्यांचे धैर्य व प्रेरणास्थान होते. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणात खूप मोठी दरी निर्माण झाली आहे कधी न भरून निघणारी आहे.लोहा कंधार मतदारसंघाचे आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्या आदेशानुसार हा कार्यक्रम पार पडला.

अजित दादा पवार हे शब्दाला जागणारे, कुशल प्रशासक व विकासाचा ध्यास घेतलेले नेतृत्व होते. त्यांच्या कार्याचा ठसा महाराष्ट्राच्या राजकारणात कायम राहील, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

या श्रद्धांजली पर आयोजित केलेल्या कार्यक्रमासदिलीप पाटील धर्माधिकारी. हनुमंतराव पाटील चव्हाण, बालाजी बच्चेवार, शिवसेना उबाठा गटाचे रवींद्र भिलवंडे, पोलीस निरीक्षक मारकड साहेब, माणिकराव लोहगावे, नारायण जाधव, रेखाताई बनसोडे, पल्लवी ताई वडजे, शिवराज जाधव मोकासदरा, सतीश मेडेवार, साईनाथ मेडेवार, प्रदीप सावकार, रवींद्र भालेराव, शरद भालेराव, विठ्ठलआप्पा बेळगे, प्रदीप पवळे, आनंद अंतरगांवकर, सटवाजी मोदलवाड, रणजीत देशमुख, रामदास भाकरे, गजानन शिंदे, दयानंद मोरे, महादेव उपाशे, रावसाहेब बेलकर, पांडुरंग शिंदे, माणिक चव्हाण, व्यंकटराव चव्हाण, डॉ. गुणवंत चिखलेकर, आनंदराव हेडगे, शिवाजी पवारसह सर्व पक्षीय कार्यकर्ते, पदाधिकारी नायगांव तालुक्यातील पत्रकार मंडळी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी अजितदादांना श्रद्धांजली अर्पण केली.

# लेखी आश्वासन हवेतच; रस्त्याविना नागरिकांची कोंडी

## भोकर गट विकास अधिकाऱ्यांच्या आश्वासनभंगामुळे पुन्हा आमरण उपोषणास सुरुवात

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. २८ जानेवारी-**

शासन लोकाभिमुख प्रशासन गवगवा करीत असताना प्रत्यक्षात मात्र एका सामान्य नागरिकाला आपल्या घराकडे जाण्यासाठी रस्ताच मिळू नये, ही बाब प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरत आहे. भोकर तालुक्यातील सोनारी येथील रहिवासी रामेश्वर विठ्ठल इबितवार यांना न्याय मिळावा म्हणून केलेले प्रयत्न प्रशासनाच्या फोल आश्वासनांमुळे निष्फळ ठरत असल्याने त्यांनी दि.२५ जानेवारी पासून डेबूजी फोर्सचे प्रदेश अध्यक्ष कैलास तेलंग यांच्या नेतृत्वाखाली परत आमरण उपोषणास बसले असल्याने रस्त्याचा विषय चिखळत चालला आहे.

सोनारी येथे जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागून इवितवार यांच्या घराकडे जाणारा रस्ता काही व्यक्तींनी अडवल्यामुळे त्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या अन्यायाविरोधात इबितवार यांनी दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी आमरण उपोषणास सुरुवात केली होती. त्यानंतर पंचायत समिती भोकरचे गट विकास अधिकारी यांनी दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी करून २० जानेवारी



२०२६ पर्यंत रस्त्याचे काम पूर्ण करण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिले होते. प्रशासनाच्या या लेखी शब्दावर विश्वास ठेवून नागरिकाने आपले आमरण उपोषण मागे घेतले.

मात्र प्रत्यक्षात आजतागायत रस्त्याच्या कामाला साधी सुरुवातही झालेली नसल्याने प्रशासनाचा दुटप्पीपणा उघड झाला आहे. लेखी आदेश, पाहणी पंचनामे आणि प्रत्यक्ष भेटी केवळ कागदावरच मर्यादित राहिल्याने प्रशासन नागरिकांना फसवत आहे का? असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे.

आपण दिलेले लेखी आश्वासन स्वतःच्या यंत्रणेमार्फत पाळण्यात अपयशी ठरलेल्या तालुका प्रशासनामुळे नाईलाजाने इबितवार यांनी दि.२५ जानेवारी २०२६ पासून पंचायत समिती भोकर समोर पुन्हा आमरण उपोषणास सुरुवात केले असल्याने शासकीय यंत्रणेनेच्या अपयशाबदल संताप व्यक्त केला जात आहे.

एका सामान्य नागरिकाला आपल्या घराकडे जाण्यासाठी आमरण उपोषणाचा मार्ग पत्करावा लागतो, ही बाब लोकशाही व्यवस्थेसाठी लाजिरवाणी आहे. गट विकास अधिकाऱ्यांनी दिलेल्या आश्वासनाची तात्काळ अंमलबजावणी न झाल्यास या प्रकरणाची दखल वरिष्ठांनी घ्यावी, अन्यथा आंदोलनाची तीव्रता वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

न्यायासाठी लढणारा नागरिक विरुद्ध उदासीन प्रशासनया संघर्षाकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले असून प्रशासन नेमके कधी जागे होणार, हा प्रश्न अनुत्तरितच आहे.

# अभ्यासपूर्वक शेती हाच शाश्वत विकासाचा मार्ग : जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. २९ जानेवारी-**

रेशीम उद्योग, दुग्ध व्यवसाय, शेळी पालन यासारख्या अनेक प्रोत्साहन देणारे योजना शासन द्वारे राबविल्या जातात शेतकऱ्यांनी लाभ घेऊन उत्पादनात वाढ करावी असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी शेतकऱ्यांना केले. मंगळवार (दि.२७) रोजी सगरोळी ता. बिलोली) येथील कृषी विज्ञान केंद्र आयोजित कृषी तंत्रज्ञान महोत्सवाच्या उदघाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संस्कृति संवर्धन मंडळाचे चेअरमन प्रमोद देशमुख, संचालक संजीव सगरोळीकर, कृषी विज्ञान केंद्राच्या प्रमुख डॉ. माधुरी रेवणवार इत्यादींची उपस्थिती होती.

नांदेड जिल्ह्यामध्ये दूध व्यवसायासाठी पूरक असे वातावरण असल्यामुळे दुग्ध व्यवसाय करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी जोड व्यवसाय बरोबरच नवीन तंत्रज्ञानाचा पण वापर करावा असे आवाहनही कर्डीले यांनी केले.

प्रगतशील शेतकरी व भाजीपाला उत्पादक बालाजी लोहकरे यांनी, पारंपरिक शेतीऐवजी फळ लागवड व भाजीपाला लागवड करावी. मागणी, गरज व बाजारपेठेचा अभ्यास करावा. आपल्या भागामध्ये टरबूज आणि खरबूज यासारख्या पिकाचे चांगले उत्पादन मिळत असल्यामुळे कमी कालावधीमध्ये जास्तीत जास्त आर्थिक फायदा आपल्याला घेता येतो, टोमॅटो उत्पादनामध्येही चांगला आर्थिक फायदा मिळू शकतो असे सांगितले.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे विस्तार संचालक डॉ. राकेश अहिरे यांनी, एकात्मिक शेतीच्या माध्यमातून नवीन पिकाचे वान वापर करून शेतकऱ्यांनी उत्पादनात वाढ करून आर्थिक प्रगती करावी असे सांगितले.

नागपूर येथील केंद्रीय कापूस संशोधन संस्थेचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. अर्जुन तायडे यांनी, सघन कापूस लागवड करून एकात्मिक व्यवस्थापन केले केल्यास पारंपारिक पद्धतीच्या तुलनेत २०-३०% जास्त उत्पादन मिळते, एकाच क्षेत्रात झाडांची संख्या वाढते, आणि लवकर जमीन आच्छादली जाऊन तणांचा प्रादुर्भाव कमी होतो. या पद्धतीत खत व पाण्याची कार्यक्षमता वाढते त्यातून उत्पादनात वाढ होते असे संगीतले.

अध्यक्षीय समारोपात प्रमोद देशमुख यांनी, शेतकऱ्यांनी कृषी तंत्रज्ञान महोत्सव कार्यक्रमाचा लाभ घ्यावा. येथील क्षेत्रावर ती पाहणी करावी, कृषी विज्ञान केंद्राची वेळोवेळी मदत घ्यावी तसेच शेतकऱ्यांनी नाविन्यपूर्ण शेती करावी व तंत्रज्ञानाचा वापर करावा असे सांगितले. यावेळी यज्ञेश कातबने धामगाव (ता. पैठण) युवा उद्योजक रत्नाकर ढगे सायाळ (ता.लोहा) या शेतकऱ्यांना कर्मयोगी बाबासाहेब देशमुख कृषीवेद युवा शेतकरी पुरस्काराने सन्मानपत्र व रोख रक्कम देऊन गौरविण्यात करण्यात आले. कार्यक्रमास दोन हजार शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## 'रासेयो'च्या विद्यार्थ्यांनी शाश्वत विकासासाठी प्रयत्न करावेत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ जानेवारी :** ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी युवकांचा सक्रिय सहभाग आणि सर्वतोपरी योगदान रासेयोच्या माध्यमातून विद्यार्थी देऊ शकतात. श्रमदान, वृक्ष लागवड, स्वच्छता अभियान, अंधश्रद्धा निर्मूलन, आरोग्यविषयक जनजागृती, महिलांचे रोगनिदान, सांडपाण्याचे व्यवस्थापन, जलसंधारण व्यवस्थापन असे विविध उपक्रम राबवून स्वयंस्फूर्तीने कार्य करावे, असे प्रतिपादन समाज प्रबोधन अकादमीचे सचिव सुधाकर शिंदे यांनी केले.

औसा तालुक्यातील चिंचोली तपसे येथे किल्लारीतील शहीद भगतसिंग महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सरपंच विश्र्वंभर सुरवसे, उपसरपंच युवराज यादव, मनोज इंजे, चव्हाण, अकादमीचे कोषाध्यक्ष डॉ. संजय मोरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संग्राम मोरे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. संदीप चव्हाण उपस्थित होते. यावेळी कोषाध्यक्ष डॉ. संजय मोरे म्हणाले, रासेयो शिबिर हे विद्यार्थ्यांना समाजसेवेतून नेतृत्व विकासासाठी घडविणारी महत्त्वाची योजना आहे. प्राचार्य डॉ. संग्राम मोरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. अशोक गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. संदीप चव्हाण यांनी आभार मानले.



# लातूर जिल्ह्यात दोन्ही सेना अस्तित्वहिन..?

## सामान्यांना प्रश्न पडलाय.. सेनेचा वाघ डरकाळी फोडणे विसरला की काय?

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ जानेवारी :** कधीकाळी शिवसेना म्हटले की, सामान्य नागरिकांच्या डोळ्यांसमोर शिवसेनेच्या वाघाचे चित्र तरळून जायचे. मागच्या काही कालखंडात शिवसेनेबद्दलचा आदर, दरारा जणू संपल्यागत झाला आहे. त्यातच सेनेत दुफळी झाल्यानेही लातूर जिल्ह्यात उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि एकनाथ शिंदेंची सेना सद्यस्थितीत अस्तित्वहिन झाल्याचे निर्दशनास येत आहे. त्यामुळे सामान्यांच्या तोंडून आता शिवसेनेचा वाघ डरकाळी फोडणे विसरला की काय ? असे एक ना अनेक प्रश्न ऐकावयास मिळत आहेत.

लातूर जिल्ह्याच्या राजकारणात शिवसेना एकसंघ असतानाही फारसे प्राबल्य दाखवू शकली नव्हती. परंतु लोकोपयोगी उपक्रमांत, सामान्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आक्रमकपणे रस्त्यावर उतरणारी शिवसेना आणि शिवसैनिक जुने जाणते लोक आजही विसरलेले नाहीत. सामान्यांच्या हितासाठी रस्त्यावर उतरणारा बाळासाहेबांचा शिवसैनिकही आता कालबाह्य झाल्यागत झाला आहे. मध्येच एकनाथ शिंदेंमुळे बाळासाहेबांच्या शिवसेनेत मोठी फूट पडली. सत्तेच्या अभिलाषेमुळे आजमितीस राजकारणात कधीही, काहीही होऊ शकते असे म्हटले जाते. एकसंघ असलेल्या शिवसेनेची शकले उडाल्याने सध्यस्थितीत दोन्ही शिवसेनांची अवस्था तशी बिकटच असल्यासारखी पाहायला मिळते.

कधीकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला असणाऱ्या लातूर जिल्ह्यात केवळ शिवसेनाच नाही तर अन्य कोणत्याही विरोधी पक्षाचे अस्तित्व दखल घेण्याजोगे वाढणार नाही, याची खबरदारी काही नेतेमंडळींकडून घेतली गेली.

आज देशात प्रथम क्रमांकाचा राजकीय पक्ष असणाऱ्या भाजपलाही याठिकाणी मजबूत पाय रोवू देण्यापासून अनेक मार्गांनी रोखले जात असल्याची अनेक उदाहरणे आहेत. दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख आणि गोपीनाथराव मुंडे या दोघांमधील जीवश्र्च कंठश्र्च मैत्री जगजाहीर होती. या दोन्ही नेत्यांनी मैत्रीत राजकारण येऊ दिले नसले तरी कायम एकमेकांना सांभाळून घेण्याचे काम तहहयात केल्याचे सर्वज्ञात आहे. ७या दोन्ही नेत्यांनंतर त्यांच्या वारसांनीही हा पायंडा पुढे चालू ठेवण्याचे काम केल्याचेही सर्वांनी पाहिले - अनुभवले आहे. मागच्या काही वर्षात जिल्ह्यात भाजपने भक्कमपणे आपली पायाभरणी केली आहे. त्यामुळे आज भाजप जिल्ह्यातही एक अग्रेसर राजकीय पक्ष म्हणून पुढे आला आहे. मात्र, कधीकाळी भाजपचा मोठा भाऊ असणाऱ्या शिवसेनेला जिल्ह्यात कधीच मोठी उभारी घेता आली नाही. सेनेकडे कोणत्याही भूमिकेवर खंबीर राहणारे नेतृत्व नसल्यानेही कदाचित असे घडले असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सेनेत दुफळी झाल्यानेही मूळ शिवसेनेतील मंडळी इकडे - तिकडे विखुरली गेली. जे बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांशी बांधील होते, ते मूळ शिवसैनिक आजही उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्याशी एकनिष्ठ आहेत. कोणत्याही पदाची अपेक्षा न धरता काही मंडळी आजही तत्वांशी बांधील आहेत. अशा चेहऱ्यांमध्ये लातूरचे ज्येष्ठ शिवसैनिक त्र्यंबक गुरुनाथ स्वामी यांच्या सारख्यांचा समावेश आहे. या मंडळींना कोणी कितीही आमिषे दाखवली तरी बाळासाहेबांचे खंदे समर्थक असणारी ही मंडळी कायम तत्वनिष्ठ राहत आली आहेत. या मंडळींमुळेच बाळासाहेबांची मूळ शिवसेना आपले अस्तित्व टिकवून आहे, ही बाबही काही कमी नाही. महाविकास आघाडीमध्ये शिवसेनेचा सहभाग असला तरीही लातुरात उद्धव ठाकरेंची शिवसेना फारसा प्रभाव दाखवण्याकामी निष्प्रभ ठरली आहे, ही बाब मान्यच करावी लागेल. जिल्ह्यात ना उद्धवसेना अस्तित्व वाढवू शकलीय ना शिंदेसेना. त्यामुळे शिवसेनेचा वाघ बदलत्या राजकीय वातावरणात डरकाळी फोडणे विसरून गेला की काय ? असा प्रश्न सामान्यांना भेडसावत असल्याचे दिसत आहे. सामान्य नागरिकांना २० टक्के राजकारण आणि ८० टक्के समाजकारण करणारी बाळासाहेबांची शिवसेना आजही हवी आहे, असे एकंदर परिस्थितीवरून निर्दशनास येत आहे. चालू असलेल्या जिल्हा परिषद - पंचायत समिति निवडणुकीतही जिल्ह्यात दोन्ही सेना निष्प्रभ थरातील असे दिसतेय. यामध्ये आमूलाग्र बदल, सुधारणा आवश्यक असल्याची भावना हिंदुत्ववादी मतदारांतून व्यक्त होताना ऐक्याला मिळतेय.

## साईसेवक प्रतिष्ठानच्यावतीने १ फेब्रुवारी २०२६ रोजी सार्वजनिक साईबाबा भंडारा उत्सव सोहळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ जानेवारी :** गेल्या ४० वर्षापासून साईसेवक प्रतिष्ठान कव्हा नाका लातूरच्यावतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी ३१ जानेवारी ते ०१ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत परमपुज्यनिय विद्यानंदजी महाराज (बाबा) गातेगावकर यांच्या उपस्थितीमध्ये सार्वजनिक साईबाबा भंडारा उत्सव २०२५-२६ चे आयोजन राजीव नगर, कव्हा ता.जि.लातूर येथे करण्यात आलेले आहे.



या भंडारा उत्सवानिमित्त ३१ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ०७ ते १० या वेळेत भजन संध्या, ०१ फेब्रूवारी २०२६ रोजी सकाळी ०७ ते ०८ या वेळेमध्ये अभिषेक व महापुजा तर ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० वा महाराष्ट्रातील प्रसिध्द कीर्तनकार परमपुज्य विद्यानंदजी महाराज (बाबा) गातेगावकर यांचे कीर्तन राजीव नगर, कव्हा ता.जि.लातूर येथे आयोजित करण्यात आलेले आहे. त्यामुळे कव्हा गाव व परिसरातील भाविकांनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन साईसेवक प्रतिष्ठान, कव्हा नाका, लातूर व समस्त ग्रामस्थ कव्हा यांच्यवतीने करण्यात आलेले आहे.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात एक दिवसीय ऑन लाइन इंटरनॅशनल वेबिनार संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ जानेवारी :** आज आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने मोठ्या प्रमाणात प्रगती होत असताना दिसून येत आहे. क्वांटम विज्ञानातून भविष्यातील संशोधनाला चालना मिळेल असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांनी केले.




महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचालित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर आणि इंडियन असोसिएशन ऑफ फिजिक्स टीचर्स (आयएपीटी) यांच्या संयुक्त विद्यमाने The Quantum Enigma: Unveiling Reality Secrets या विषयावर एक दिवसीय ऑन लाइन इंटरनॅशनल वेबिनार आयोजित करण्यात आले होते यावेळी ते अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते. यावेळी उद्घाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील भौतिकशास्त्र विभागातील प्रोफेसर डॉ.के.एम.जाधव, Mahle Constructor University, Slovenia येथील डॉ.झाक्लिना लुबेई, Velika Gorika, Zagreb, Croatia येथील अन्तोनिजा बरीसिक, प्रभारी प्राचार्य डॉ.आनंद शेवाळे, मुख्य समन्वयक डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, मुख्य संयोजक डॉ.एस.एम. डोंगरगे, सहसंयोजक डॉ.ए.एच. हेडाव, सह संयोजक प्रा.आर. एस.देव्हडे, डॉ.एम.एम.बेटकर आणि डॉ.अमित पवार यांची उपस्थिती होती.

यावेळी डॉ.के.एम.जाधव यांनी नवीन तंत्रज्ञान हे क्वांटम तंत्रज्ञानावर आधारित आहे असे सांगितले. तर आंतरराष्ट्रीय स्तरावरून डॉ. झाक्लिना लुबेई यांनी मानवाच्या मेंदूची रचना आणि कार्यपद्धती नैसर्गिकरित्या वेगवेगळी असते आणि ही वेगळेपणाची अवस्था आजारपण नसून मानवी विविधतेचा भाग आहे असे सांगितले.

अन्तोनिजा बरीसिक यांनी आधुनिक जगात भौतिकशास्त्राचा वापराबद्दल माहिती दिली. तर डॉ. जी. एच. जाधव यांनी फोटॉन सिद्धांत, नॅनो-स्केल डिव्हाइसेसमधील चार्ज कॅरिअर मॉडेलिंग, क्वांटम फिजिक्सचे आधुनिक नियम आणि सेमीकंडक्टर डिव्हाइस स्केलिंगवरील क्वांटम परिणाम या विषयांवर सविस्तर माहिती दिली. आइनस्टाईच्या क्वांटम सापेक्षकांच्या काही संकल्पनांवर आक्षेप घेऊन त्यांच्या विरुद्ध सापेक्ष प्रात्यक्षिक मांडून क्वांटमच्या नवीन संशोधनाला वाट करून देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रात्यक्षिकासाठी ते प्रयत्नशील आहेत असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.आर.एस.देव्हडे यांनी केले प्रमुख पाहुण्यांचे परिचय प्रा.डॉ. अविनाश हेडाऊ यांनी केले तर आभार डॉ.करणसिंह मोरे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.राम पाटील, प्रा.पंकज साळवे, प्रा.गोपाल रांजनकर, प्रा.पी. एल.पाटोळे, प्रा.ए.एस.कल्याणी, प्रा.एस.सी.राजे, प्रा.सोनाली खुब्बा यांचे सहकार्य लाभले.

या आंतरराष्ट्रीय वेबिनारमध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांबरोबरच इतर राज्यांतून मिळून ३१७ प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

## शाळेत शिक्षक नसल्याचे पाहून रुद्धाच्या सरपंचांनीच घेतली शाळा

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. २९ जानेवारी :** निवडणुकीच्या प्रशिक्षणासाठी जिल्हा परिषद शाळेतील सर्व शिक्षक गेल्याने शाळा ओस पडल्याचे माहिती मिळताच रुद्धा (ता. अहमदपूर) येथील सरपंच गजानन चंदेवाड यांनी स्वतः शाळेत जाऊन विद्यार्थ्यांचे वर्ग घेतले. केवळ पाहणी करून न थांबता, त्यांनी विद्यार्थ्यांना 'कौशल्य विकास' या विषयावर मार्गदर्शन करत एक आगळावेगळा आदर्श समाजासमोर ठेवला आहे.



सध्या प्रशासनाकडून निवडणुकीच्या अनुषंगाने शिक्षकांना विविध जबाबदाऱ्या आणि प्रशिक्षणे दिली जात आहेत. यामुळे ग्रामीण भागातील अनेक शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता भासत असून त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर होत आहे. हीच परिस्थिति रुद्धा येथील जिल्हा परिषद शाळेत निर्माण झाली होती. दि २४ जानेवारी रोजी शाळेत शिक्षक उपलब्ध नसल्याची बाब समजताच सरपंच गजानन चंदेवाड यांनी तात्काळ शाळेत धाव घेतली आणि शिक्षकाची भूमिका बजावत विद्यार्थ्यांना जमेल त्या पद्धतीने मार्गदर्शन केले.

एकेकाळी ग्रामीण शिक्षणाचा कणा असलेल्या जिल्हा परिषद शाळांची अवस्था सध्या बिकट होताना दिसत आहे. वर्षानुवर्षे कमी होत जाणारी पटसंख्या यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. पट अभावी अनेक ठिकाणी शाळांचे विलीनीकरण होत असून, एकेकाळी नामांकित मानली जाणारी ही शिक्षण व्यवस्था आता नाममात्र ठरताना दिसत आहे. अशा परिस्थितीत, सरपंच गजानन चंदेवाड यांनी दाखवलेली तत्परता आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याप्रती असलेली तळमळ कौतुकाचा विषय ठरत आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांत महिला बालविकास विभाग यंत्रणा निर्माण व्हावी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ जानेवारी :** महिला व बाल विकास विभागाकडील पदांचा आकृतिबंध सर्वसमावेशक करावा, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांत महिला व बालविकास विभाग यंत्रणा निर्माण करावी, अशी मागणी महिला व बाल विकास विभागाच्या राजपत्रित अधिकारी संघटना व इतर संघटनांच्या वतीने पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. महिला व बाल विकास विभागामार्फत ग्रामीण व शहरी क्षेत्रात एकात्मिक बालविकास सेवा योजना तसेच महिलांसाठी विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यात येते.या विभागामार्फत विधिसंघर्षग्रस्त बालके, निराधार निराश्रित महिला, हुंडा प्रतिबंध, बालविवाह प्रतिबंध, अशा अनेक योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, लेक लाडकी, प्रधानमंत्री मातृवंदना योजना याच विभागामार्फत राबविल्या जातात. मात्र, या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न बऱ्याच कालावधीपासून प्रलंबित आहेत.

महिला व बालकल्याण विभागाकडील विविध योजनांसाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करावे, विभागाकडील विविध संवर्गाचे सेवा प्रवेश नियम सुधारणा करावे, जिल्हा परिविक्षा अधिकारी पद राजपत्रित जाहीर करावे, पर्यवेक्षिका व मुख्यसेविका संवर्ग एकत्रीकरण आणि वेतन तफावत सुधारणा करावी, विविध स्तरांवरील पदोन्नती प्रकरणे विहित कालमर्यादेत पूर्ण करावीत, अंगणवाडी कर्मचाऱ्यांना नियमित कर्मचारी दर्जा द्यावा व स्वतंत्र सेवा प्रवर्ग तयार करावा, अशा विविध मागण्या करण्यात आल्या आहेत.

यावेळी पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक त्या सूचना संबंधितास देण्यात येतील, असे आश्र्वस्त केले. यावेळी महिला व बालविकास विभागाकडील राजपत्रित अधिकारी संघटना, पर्यवेक्षिका संघटना, संरक्षण अधिकारी संघटना, परिवीक्षा अधिकारी संघटना, अंगणवाडी कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## निष्ठावंत पारंपरिक शिंप्याची दु:खभरी कहाणी म्हणजे उसवण होय : सौदागर

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. २९ जानेवारी :** पोटाची खळगी भरण्यासाठी प्रत्येकाला काही ना काही उद्योग व्यवसाय करावाच लागतो. जेंव्हा लोकांच्या जीवनपद्धतीत लहानमोठे बदल होतात. तेव्हा काही प्रस्थापित व्यवसाय आणि सामाजिक सस्था कालबाह्य होऊन नष्ट होतात मग त्यांच्याशी निगडित असणाऱ्या व्यक्ती समाजात उपऱ्या होऊन जातात तर काही जणांचे जीवन उदध्वस्त होऊन जाते. असाच शिलाई व्यवसाय करणाऱ्या एका निष्ठावंत पारंपरिक शिंप्याची दुःखभरी कहाणी म्हणजे उसवण ही कादंबरी होय असे मत प्रसिद्ध साहित्यिक देविदास सौदागर यांनी व्यक्त केले.




अमर्याद ज्ञान मर्यादित वेळेत प्राप्तीसाठी गेल्या पंधरा वर्षापासून अखंडितपणे चालू असलेल्या चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गत डॉ. हणमंत पवार यांच्या अध्यतेखाली संपन्न झालेल्या वाचक संवादचे ३५३ वे पुष्प देविदास महादेव सौदागर यांनी युवा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त उसवण या साहित्यकृतीवर संवाद साधून गुंफले. पुढे बोलताना ते म्हणाले. शहरात लोकप्रिय असलेले अल्प दरातील रेडिमेड कपडे जेंव्हा खेड्यांतही सहज मिळूलागत. त्याचा शिंप्याच्या जीवनावर विपरीत परिणाम होऊन धंदा बंद पडून त्याचे कुटुंब उपासमारीच्या खाईत लोटले जाते.

या संवादा नंतर झालेल्या चर्चेत अनेकांनी सहभाग नोंदवला. यावेळी उपस्थितांना जन्मदिनाची ग्रंथ भेट देण्यात आली. शेवटी अध्यक्षीय समारोपात डॉ. हनुमंत पवार म्हणाले कष्टकरी शिंप्याच्या जगण्याची लढाई , निर्मिती करतानाचे अनुभव, प्रकाशन ते युवा साहित्य अकादमीपर्यंतचे विविध अनुभवही सौदागर यांनी मांडले ते सर्व कष्टरी व्यावसायिक या सर्वांसाठी अत्यंत प्रेरणादायी असून या वाचक संवादच्या माद्यमातून सर्वांपुढे आले. आजच्या काळासाठी हे काम खूप महत्वाचे आहे.

शासकीय दूध डेअरीच्या सभागृहात संपन्न झालेल्या या अत्यंत प्रभावी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुरेश शिंदे यांनी केले, संवादकांचा परिचय डॉ. ज्ञानदेव राऊत यांनी करून दिला शेवटी आभार वीरभद्र स्वामी यांनी मानले. या कार्यक्रमास प्रसिद्ध साहित्यिक सुरेंद्र रावसाहेब पाटील, माजी गट शिक्षणाधिकारी नागोराव भोसले, बालाजी बिरादार, प्राचार्य विजयकुमार पाटील गणेशपूरकर, डॉ. नामदेव खंडगावे, उद्योजक रमेश अंबरखाने, डॉ.अनिल भिकाने यांचेसह अनेक मान्यवर उपस्तिथ होते.

## गिलचे यांना गुणवंत शिक्षक पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ जानेवारी :** महाराष्ट्र राज्य समता शिक्षक परिषद, जळगावच्या वतीने देण्यात येणारा महात्मा ज्योतिराव फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त लातुरातील इंदिरा गांधी विद्यालयातील शिक्षक बस्वराज गिलचे यांना यंदाचा राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष, ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. जळगावातील बचत भवन येथे आयोजित सोहळ्याला नाशिकचे माजी शिक्षक आमदार किशोर दराडे, मुंबई येथील ज्येष्ठ पत्रकार किरण सोनवणे, समता शिक्षक परिषद महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष भरत शिरसाट, उपाध्यक्ष रणजित सोनवणे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी शिक्षक बस्वराज गिलचे यांना मान्यवरांच्या हस्ते मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. या यशाबद्दल संस्था सचिव राजेंद्र इंद्राळे, शाळेचे मुख्याध्यापक एस.एन. पेठे, बी.डी. इंद्राळे, बी.व्ही. सुडे, एन.डी. स्वामी, राहुल जाधव, संदीप येलमटे, दीपाली इंद्राळे, आशा दुभासे, गणेश आकनगिरे, सचिन गोंडगावे, जगदीश सूर्यवंशी, पंढरीनाथ महंकावार, प्रदीप राठोड, परमेश्वर गायकवाड, ज्ञानोबा गायकवाड, महेश शिंदे-बाकलीकर यांनी कौतुक केले आहे.

## दयानंद विधी महाविद्यालय, लातूर येथे मानसिक आरोग्यावर राष्ट्रीय परिसंवाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ जानेवारी :** दयानंद एज्युकेशन सोसायटीच्या दयानंद विधी महाविद्यालय, लातूर येथील महिला अध्ययन केंद्राच्या वतीने हॉलिस्टिक अप्रोच टू मेंटल वेलनेस या विषयावर शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रीय स्तरावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

आजच्या धकाधकीच्या, स्पर्धात्मक आणि तणावपूर्ण जीवनशैलीत मानसिक ताण, अस्वस्थता, नैराश्य व भावनिक थकवा वाढत असून मानसिक स्वास्थ्य जपणे ही काळाची गरज बनली आहे. शारीरिक आरोग्याइतकेच मानसिक आरोग्य महत्त्वाचे असून ते समग्र दृष्टीकोनातून समजून घेणे आवश्यक आहे. या पार्श्र्वभूमीवर मानसिक आरोग्याविषयी समाजात जागरूकता निर्माण करणे व मानसिक स्वास्थ्याकडे सर्वांगीण दृष्टीने पाहण्याची गरज अधोरेखित करणे हा या परिसंवादाचा मुख्य उद्देश आहे.

या परिसंवादात प्रा. डॉ मीत शिंदे, प्राध्यापक पी. एन. दोशी कॉलेज, मुंबई, तसेच डॉ. उज्ज्वल अनिल नेने, मानसोपचारतज्ज्ञ, के. ई. एम. रुग्णालय, पुणे, हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. परिसंवादात मानसिक आरोग्याशी संबंधित सामाजिक, मानसिक व कायदेशीर पैलूंवर तज्ज्ञांकडून सखोल विचार मांडले जाणार आहेत. या राष्ट्रीय परिसंवादाचा लाभ संशोधक, प्राध्यापक, वकील, डॉक्टर, विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.